दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.




बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे | अंक –३४२ | शुक्रवार,दि.१५ ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-342 | Friday, Dt.15 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# भाजपा आणि पवारांच्या बालेकिल्ल्यात अजितदादांच्या राष्ट्रवादीसह विकासाची वाढली टिकटिक...!

## भाजपा नेत्या पंकजा मुंडेंना राजकीय चक्रव्युहात अडकवण्याचा कुटील डाव ?





बीड / वैभव स्वामी

पुरोगामी विचारांचे प्रभुत्व असलेल्या बीड जिल्ह्यावर शरद पवारांच्या नेतृत्वाने घेरले. पवारांच्या वाढत्या वर्चस्वाला तत्कालीन भाजपाने नेते गोपीनाथराव मुंडे यांनी मोठ्या शिताफीने छेद दिला आणि बीड जिल्ह्याला भाजपाचा बालेकिल्ला केला. या बालेकिल्ल्याला सुरुंग लावण्याचे धाडस एकमेव धनंजय मुंडे यांना तत्कालीन परिस्थितीमध्ये करता आले. यासाठी मोठा संघर्ष त्यांना करावा लागला. धनंजय मुंडे हे बीड जिल्ह्यावर आपले वर्चस्व निर्माण करत असतानाच त्यांना मसाजोग प्रकरणामध्ये नाहक गालबोट लागले आणि शिखरावर कळस गाठता गाठता राजकीय वनवासात जाण्याची दुर्दैवी वेळ आली. अशा कठीण प्रसंगात बीड जिल्ह्याची धुरा कणखर आणि परखड नेतृत्व असलेल्या अजित दादांनी स्वीकारली.बीड जिल्ह्याचे पालकत्व जबाबदारीने पार पाडत त्यांनी जिल्ह्याच्या विकासाची गजर तर वाजवलीच शिवाय कळत नकळत बीड जिल्ह्यावर अजितदादांच्या राष्ट्रवादीची टिकटिक

पान ३ वर...

### माजी मंत्री धनंजय मुंडे यांना दादांची भक्कम साथ...

मसाजोग प्रकरणानंतर माजी मंत्री धनंजय मुंडे यांची राजकीय प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न पक्षांतर्गत आणि विरोधी पक्षातील नेतृत्वांनी केला. यामध्ये बऱ्यापैकी विरोधकांना यश देखील मिळाले. कणखर नेतृत्व असलेले धनंजय मुंडे सुद्धा मनाने कुठेतरी खचले. त्यामुळे त्यांच्यावर शारीरिक व्याधींचे आक्रमण जास्त झाले. ते मनाने आणि शरीराने देखील अस्वस्थ झाले. अशा कठीण प्रसंगात मोठा भाऊ म्हणून अजित दादांनी प्रसंगी जातीला अंगावर घेत धनंजय मुंडेंना भक्कम पाठबळ आणि साथ दिली. त्यांना पुन्हा एकदा नवी राजकीय उभारी देण्यासाठी ताकद देण्यात सुरुवात केली. त्यामुळेच ज्या बीड जिल्ह्यात धनंजय मुंडे यांची राजकीय प्रतिमा डागाळली गेली त्याच जिल्ह्यामध्ये त्यांची राजकीय प्रतिमा कशी सुधारली जाईल हे बारकाईने पहात दादांनी धनंजय मुंडे यांना राजकीय आणि विकासाच्या प्रवाहात हळूहळू सोबत घेत पुन्हा एकदा त्यांच्या पंखात बळ देण्यास सुरुवात केली आहे.त्यामुळे भविष्यात धनंजय मुंडे या संघर्षावर मात करत पुन्हा एकदा बीड जिल्ह्यातील जनतेचा विश्वास संपादन करून ताठ मानेने महाराष्ट्राच्या सरकारमध्ये दादांच्या खांद्याला खांदा लावून एक सक्षम मंत्री म्हणून नावारूपाला आले तर नवल वाटायला नको.

### ताईंनी वेळीच लक्ष घातले नाही तर भविष्यात अवघड...

मंत्री झाल्यानंतर भलेही बीड जिल्ह्याचे पालकत्व ताईंना मिळाले नसले तरीदेखील ताईंनी पालक होऊन बीड जिल्ह्याच्या प्रश्नांना सरकार दरबारी न्याय देणे अपेक्षित आहे. बीड जिल्ह्यातील जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी ताईंनी परळी सह बीड जिल्ह्यामध्ये आपला कायम संपर्क दौरे, गाठीभेटी घेणे गरजेचे आहे. मात्र असे होताना प्रत्यक्षात दिसत नाही. ताई बीड जिल्ह्यात जेव्हा येतात तेव्हा त्यांचा दौरा संभाजीनगर विमानतळ ते मोटारीने परळी नंतर मोटारीने संभाजीनगर विमानतळ यापेक्षा दुसरा दौरा फारसा दिसत नाही. जर जनतेशी संपर्कच ठेवला नाही आणि संपर्काची नाळ तुटत गेली तर जुने लोक फक्त विचाराने सोबत राहतील प्रत्यक्षात ते सोबत नसतील आणि नवीन पिढी जोडली जाणार नाही. त्यामुळे भविष्यात जर मातब्बर असलेले नेते, कार्यकर्ते पाठीशी राहिले नाहीत तर बीड जिल्ह्याचे राजकारण करताना ताईंना कठीण जाईल. यामुळे ही परिस्थिती बदलण्यासाठी किमान आता तरी ताईंनी स्वत:मध्ये बदल करत बीड जिल्ह्याला जास्तीत जास्त लक्ष देणं, वेळ देणं गरजेचं आहे हे नक्की.

### पवारांच्या राष्ट्रवादीलाही दणका..

लोकनेते शरदचंद्र पवार साहेब यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बीडला खासदार आहे. बीड विधानसभेवर त्यांचाच बोलबाला आहे. असे असले तरीसुद्धा अजितदादांनी बीड विधानसभेला लक्ष केंद्रित करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात विद्यमान आमदारांच्या निकटवर्ती यांना फोडून आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश दिलेले आहेत. त्यामुळे आगामी काळात बीड विधानसभा कार्यक्षेत्रात देखील मोठ्या पवार साहेबांपेक्षा दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वर्चस्व वाढले तर आश्चर्य वाटायला नको.

### न समजलेले आई बाप विषयावर प्रसिद्ध व्याख्याते डॉ.वसंत हंकारे सर यांच्या व्याख्यानस उपस्थित राहावे

वडवणी ।प्रतिनिधी

देवदूत प्रतिष्ठान वडवणी च्या वतीने डॉ.ओमप्रकाश शेटे साहेब अध्यक्ष आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य समिती यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १६/०८/२०२५ शनिवार रोजी सकाळी १०. वा.राम मंदिर चौक वडवणी येथे महाराष्ट्र राज्यातील प्रसिद्ध व्याख्याते डॉ वसंत हंकारे सर यांचा चला जगूया आनंदाने सुखी जीवनाचा मुलं मंत्र शिकवणारे , न समजलेले आई बाप विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे डॉ.ओमप्रकाश शेटे साहेब आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य समिती चे अध्यक्ष, कार्यक्रमाचे अध्यक्ष ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके, व श्री बंडू खांडेकर देवदूत प्रतिष्ठान अध्यक्ष यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे तरी वडवणी शहरातील सर्व तरुण, विध्यार्थी , पालकांनी उपस्थित राहावे असे आवाहन देवदूत प्रतिष्ठान वडवणी च्या वतीने करण्यात आले आहे.

### प्रशासकीय इमारत येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम

बीड ।प्रतिनिधी

जिल्ह्यात विविध ठिकाणी ध्वजारोहण केले जाणार असून प्रशासकीय इमारतीच्या प्रागंणात १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे ध्वजारोहणाचा कार्यक्रम अप्पर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक बीड, यांच्या हस्ते यांच्या सकाळी ८.३० वाजता होणार आहे. हा ध्वजारोहण समारंभ संपल्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रागंणात ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभास सकाळी ८.४५ पूर्वी शासकीय गणवेषात उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777






**टी.सी हरवली आहे**

विशाल अंकुश जाधव रा. मसई तांडा नंबर-३ ता.अंबड जि.जालना या नावाची मत्स्योदरी महाविद्यालय अंबड इयत्ता १२ वी पास ची टी.सी अंबड ते बीड प्रवासादरम्यान हरवली आहे. सापडल्यास खालील मो.नं. वर संपर्क करावा...

**मो.७८२२०४२५११**

# एस. टी. तोट्यात का? योग्य विचार व्हावा!

राज्याची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी एस. टी. ही आर्थिक गर्तेत इतकी सापडली आहे, की कर्मचाऱ्यांना महिन्याला वेतन देणेही आता कठीण होत चालले आहे. त्यासाठी दर महिन्याला शासन दरबारी मदतीसाठी उभे राहावे लागत आहे. साधारणपणे १९९० नंतर एस. टी. महामंडळ तोट्यात जाण्यास प्रारंभ झाला व हा तोट्याचा आलेख चढताच राहिला आणि दुसरीकडे खासगी वाहतूकदारांच्या फायद्याचा आलेख मात्र चढताच राहिला. जर खासगी वाहतूकदार आपला व्यवसाय फायद्यात करू शकतात, तर एस. टी. महामंडळ तोट्यात का चालले आहे. याचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

एस. टी. महामंडळ फायद्यात चालावे अशी राज्य शासनाची मानसिकता असेल तर एस. टी. महामंडळाला पूर्ण स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे. महामंडळावर राज्य शासनाचा अंकुश असावा पण हस्तक्षेप नको. चालक, वाहक आणि कर्मचारी यांच्या बदलीतही राज्य शासनाचा हस्तक्षेप असतो तो आता तरी बंद करावा त्यापेक्षा परिवहन विभाग आणि वाहतूक विभाग यांनी नियमांची अंमलबजावणी योग्य रीतीने आणि काटकोरपणे केल्यास राज्य शासनाला एस. टी. महामंडळाला अनुदान देण्याची गरज भासणार नाही. खासगी वाहतूकदारांना कोणतेही अनुदान नसताना ते जर आपला व्यवसाय फायद्यात करू शकतात तर एस. टी. महामंडळ आपला व्यवसाय फायदा नको, तर ना नफा, ना तोटा का करू शकत नाही याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. नुकत्याच घेतलेला भाडेपट्टा कराराचा कालावधी वाढवून ३ घेण्याच्या निर्णयामुळे फायदा सोडा, तोटा आणखीच वाढेल. त्यावेळी एस. टी.च्या जागा विकून एस. टी. महामंडळाचा तोटा कसा काय भरून निघेल हे एक कोडेच आहे.

एस. टी. महामंडळ तोट्यात जाण्यासाठी अनेक करणे आहेत, प्रमुख्याने एस. टी.वरील संचालक मंडळ, प्रशासन, प्रादेशिक परिवहन विभाग आणि शासनाचा हस्तक्षेप या आहेत. एस. टी. महामंडळाच्या संचालकाची नेमणुका हे राज्यशासन करते. हे संचालक कोण असतात? तर ते राजकारणी नेत्यांचे हित-संबंधी व्यक्ती असतात. त्यांचा सार्वजनिक प्रवासी वाहतुकीचा अभ्यास किती असतो हा एक संशोधनाचा विषय असतो. १९६० पासून सुरुवातीच्या २५ ते ३० वर्षांच्या कालावधीत सन्मानाने आणि फायद्यात चालणारी एस. टी. तोट्यात का जाऊ लागली याचा कधी अभ्यास, विचार तरी कोणी केला का? की फक्त एस. टी. महामंडळाच्या कामाकरिता निघणाऱ्या निविदाचाच विचार केला गेला. एस. टी. फायद्यात चालवी म्हणून संचालक मंडळ काय प्रयत्न करते? याचा राज्य शासनाने त्यांना कधी जाब विचारला का? एस. टी. महामंडळ प्रामुख्याने प्रवासी आणि एस. टी. कर्मचारी यांच्यामुळेच चालते हे कोणीच नाकारू शकत नाही, म्हणून संचालक मंडळात किमान एक संचालक तरी प्रवाशांचा प्रतिनिधी असावा आणि एक संचालक एस. टी. कर्मचाऱ्यांचा प्रतिनिधी असावा. जेणेकरून त्यांचा अनुभवाचा आणि अभ्यासाचा उपयोग करून घेता येईल.

दुसरी गोष्ट म्हणजे प्रशासन एस. टी.चे प्रशासकीय कामकाज एस. टी. मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक आणि सर्व महाव्यवस्थापक पाहतात, संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाने, सहकार्याने धोरणात्मक निर्णय घेतात. काही वर्षांपूर्वी एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष हे सत्ताधारी पक्षाचे विद्यमान आमदार असायचे पण नंतर एखादेवेळी एस. टी.चे हित पाहून एस. टी.चे अध्यक्ष म्हणून परिवहन मंत्री, महाराष्ट्र सरकार यांचीच नियुक्ती केली जाऊ लागली. ती आजतागायत. हा राज्य शासनाने घेतलेला निर्णय योग्य की अयोग्य याचा विचार कारण्यांची आवश्यकता आहे. हा निर्णय घेतल्यापासून एस. टी.ची प्रगती झाली की अधोगती? त्यावेळेपासूनच एस. टी. तोटा वाढायला लागला, एस. टी.चा तोटा कमी करण्यासाठी बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा. एस. टी.चे भूखंड भाडेतत्त्वावर देणे, गाड्या भाडेतत्त्वावर घेणे यासारखे अनेक निर्णय घेऊन एस. टी. महामंडळ अधिकच अडचणीत आणि तोट्यात आले. एस. टी.चा तोटा कमी करण्यासाठी प्रवासी भाडे वाढ, भाडेपट्टाचा कालावधी वाढविणे असे पर्याय नसून वाढत गेलेला आर्थिक भ्रष्टाचार हे असून याचा अभ्यास करून त्यावर वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे. परिवहन मंत्रीच एस. टी. अध्यक्ष असल्यामुळे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय, महाव्यवस्थापक आणि तत्सम अधिकारी आपले विचार, मत, सूचना किंवा निर्णय ठामपणे मांडू शकत नाहीत किंवा मांडत नाही. पूर्वी अध्यक्ष-उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाव्यवस्थापक आणि तत्सम अधिकारी एकत्रित धोरणत्मक किंवा निर्णय घेत, आवश्यक त्या ठिकाणी परिवहन मंत्री यांची मदत, मार्गदर्शन घेत. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना सखोल अभ्यास व चर्चा व्हायची. आता वर वर विचार करून निर्णय घेतले जातात. आताचेच उदाहरण द्यायचे झाल्यास गणपती उत्सवात कोकणवासीय प्रवाशांकडून वैयक्तिक तिकीट घेतल्यास प्रवास भाड्यात १५% सवलत आणि ग्रुपधारक प्रवाशाला ३०% जादा प्रवासी भाडे, म्हणजे किरकोळ विक्रीवर सवलत, घाऊक विक्रीवर अधिभार, हे कोणते व्यवसायिक धोरण? ही सूचना सुचवणारे सुपीक डोके कोणाचे? ३०% प्रवास भाडेवाढीचा निर्णयाला प्रवाशांचा निषेध, नाराजी यामुळे एका दिवसात निर्णय मागे घ्यावा लागला.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१९३ दि.०४.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान /श्रीमती दादासाहेब अंबादास वनवे, रा.गहिनीनाथनगर, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | दिपाली दादासाहेब वनवे | मुलगी | २९.१०.२००९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२०५ दि.०८.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान /श्रीमती प्रशांत बप्पासाहेब म्हस्के, रा.आखतवाडा ता.पैठण जि.छ.संभाजीनगर** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अनुजा प्रशांत म्हस्के | मुलगी | ०२.०९.२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२०९ दि.०७.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान /श्रीमती अन्सार गुलाम अहेमद कुरेशी, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अफ्फान अन्सार कुरेशी | मुलगा | २४.०२.२००९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२०८ दि.०७.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान /श्रीमती अन्सार गुलाम अहेमद कुरेशी, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नुसईबाअफशीन अन्सारी कुरेशी | मुलगी | ०८.०८.२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२५८ दि.१२.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान /श्रीमती अनिल लक्ष्मण वाघ, रा.सोनक पिंपळगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रतिक अनिल वाघ | मुलगा | ११.०८.२०१९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १२/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२०३ दि.०७.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान /श्रीमती चरणदास शेषराव राठोड, रा.गंगाराम वाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्रेया चरणदास राठोड | मुलगी | १४.०४.२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-११५ दि.२२.०७.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान /श्रीमती गौतम सुखदेव सुळे, रा.भगवाननगर, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | गौरी गौतम सुळे | मुलगी | २३.०९.२०२२ |
| २ | ज्ञानदा गौतुम सुळे | मुलगी | १५.०४.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २२/ ०७ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२३८ दि.०८.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान /श्रीमती वसंत उत्तम राठोड, रा.मसई तांडा-१, ता.अंबड, जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कुणाल वसंत राठोड | मुलगा | २६.०६.२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२२५ दि.०८.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान /श्रीमती कृष्णा बळीराम राठोड, रा.मसई तांडा-१, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रविण कृष्णा राठोड | मुलगा | ०१.०१.२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२०७ दि.०७.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान /श्रीमती अन्सार गुलाम अहेमद कुरेशी, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अन्सार गुलाम अहेमद कुरेशी | स्वतः | २२.०९.१९८० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



पान १ वरून.....

### भाजपा आणि पवारांच्या...

वाढवण्यामध्ये उभारी देखील घेतली आहे. जर दादांची घोडदौड अशीच चालू राहिली तर रमेश आडसकर आणि राजाभाऊ मुंडे यांच्यानंतर अनेक दिग्गज नेत्यांची रांग लागली तर नवल वाटायला नको. एकूणच भविष्यात लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना पक्षांतर्गत विरोधक आणि विरोधक राजकीय चक्रव्युहा मध्ये अडकवण्याचा कुटिल डाव तर रचला जात नाही ना ? आणि यामध्ये ताई त्यांच्या स्वभावामुळे अडकत तर जात नाहीत ना ? असे प्रश्नचिन्ह सामान्य जनतेच्या मनात उभे राहिले जाऊ लागले आहेत.

बीड जिल्ह्याचे राजकारण भल्या भल्यांना लवकर लक्षात आले नाही. बीडचे नेते कधी, केव्हा, कुठे कोणाला धक्का देतील आणि कोणाला उभारी देतील याची शाश्वती दस्तूर खुद्द शरदचंद्र पवार साहेबांना सुद्धा आली नाही. याच परिस्थितीतून दिवंगत भाजपा नेते गोपीनाथराव मुंडे यांना देखील जावे लागले. राज्याच्या नव्हे देशाच्या राजकारणात लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी आपले अबाधित वर्चस्व एकीकडे निर्माण केलेले असताना दुसरीकडे मात्र त्यांना स्वतःच्या बीड जिल्ह्यात भाजपाला बालेकिल्ला करून सुद्धा कायम संघर्ष करावा लागत होता. ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही.या राजकीय परिस्थिती नंतर आज बीड जिल्ह्याची राजकीय परिस्थिती खूपच बदललेली आहे.पंकजाताई मुंडे यांच्या स्वच्छ राजकारणामुळे सामान्य जनता आणि मुंडे साहेबांना मानणारा मोठा वर्ग त्यांच्या पाठीमागे काल होता, आजही आहे उद्याही राहील. पण ज्या कार्यकर्त्यांना, नेत्यांना नेतृत्व करायचे आहे राजकारण करायचे आहे ते राजकीय प्रवाहाच्या विरोधात, सत्तेच्या विरोधात फार काळ राहू शकत नाहीत. या परिस्थितीचा अंदाज घेऊन अजित दादांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सत्तेची दारे खुल जा सिम सिम करण्यापर्यंत ज्या धनंजय मुंडे यांनी आपले राजकीय कसब पणाला लावले याची जाणीव ठेवून अजित दादांनी देखील धनंजय मुंडे यांना मोठी राजकीय संधी दिली. त्यामुळे माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी भाजपाच्या बालेकिल्ल्यात अजित पवारांच्या नेतृत्वाखाली शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस भक्कम करण्यास सुरुवात केली. पुढे अजित दादांनी मोठ्या पवार साहेबांना सोडून सत्तेत राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षासह घड्याळ या चिन्हासह सहभागी झाले. दादांच्या सोबत धनंजय मुंडे आपल्या संपूर्ण ताकतीने पाठीशी उभे राहिले. त्यामुळे त्यांना मंत्रिमंडळात चांगली संधी दिली गेली. बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सुगीचे दिवस आले. अजितदादांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बीड जिल्ह्यात बालेकिल्ला होण्याच्या उंबरठ्यात असतानाच मसाजोग प्रकरण घडले. आणि अचानक धनंजय मुंडे यांचे राजकीय वासे फिरले. दरम्यान भारतीय जनता पार्टीला नाविलाजास्त पंकजा मुंडे यांना आमदार करून मंत्री करावे लागलेले होते. आमदार झाल्यानंतर आणि त्यानंतर मंत्रिपदाची संधी मिळाल्यानंतर ताईंनी परळी मतदारसंघ आणि बीड जिल्ह्यावर आपली पकड निर्माण करणे अपेक्षित होते. मात्र ताईंनी बीड जिल्ह्याला मंत्री झाल्यानंतर सुद्धा वाऱ्यावरच सोडले. त्यामुळे भाजपातले मातब्बर नेते धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची प्रतिमा डागाळलेली असताना सुद्धा अजितदादांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहीर प्रवेशाची प्रक्रिया वाढली. बघता बघता कार्यकर्त्यांसोबतच मातब्बर नेते देखील अजित दादांचे नेतृत्व स्वीकारून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करत आहेत. ज्या रमेश आडसकरांनी भारतीय जनता पार्टीच्या तिकिटावर विधानसभा निवडणूक लढवली होती. त्यांनी भाजपा पक्ष सत्तेत असताना सुद्धा पक्ष सोडून अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. यानंतर माजलगाव मतदार संघामध्ये मातब्बर नेते असलेले ज्यांनी आपल्या राजकीय उभ्या आयुष्यात लोकनेते गोपीनाथराव मुंडे आणि त्यांच्यानंतर पंकजाताई मुंडे यांना दैवत मानून कायम एकनिष्ठ राहिले ते राजाभाऊ मुंडे आणि त्यांचे चिरंजीव बाबरी मुंडे विधानसभा निवडणुकीत अपक्ष म्हणून रिंगणात उभे राहिले. ताईंना त्यांना समजावण्यामध्ये आपलसं करण्यामध्ये यश आलं नाही. आणि शेवटी कंटाळून राजाभाऊ मुंडे यांनी अनपेक्षितपणे ताईंची साथ सोडत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अजितदादांचे नेतृत्व स्वीकारून बाबरी मुंडे सह जाहीर प्रवेश केला. एकीकडे बीड जिल्ह्यात डागाळलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची प्रतिमा सुधारण्यासोबतच बदनाम झालेल्या बीड जिल्ह्याला पुन्हा एकदा चांगले दिवस देण्याची किमया अजितदादा यांनी साधत विकासाची गजर देखील जोरदार वाजवली आहे. ७५ वर्षापासून ज्या बीडकरांनी रेल्वेचे स्वप्न पाहिले होते ते स्वप्न लवकरच पूर्ण होण्याच्या उंबरठ्यावर आहे. येणाऱ्या १७ सप्टेंबर पासून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधत अजितदादांनी बीड ते अहिल्यानगर रेल्वे सुरू करण्याचा संकल्प केला आहे. बीड येथे विमानतळ उभारण्यासाठी घोषणा केली आहे. बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कुठेही निधीची कमतरता पडू नये यासाठी सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना फैलावर घेतले आहे. चांगले अधिकारी बीड येथे नियुक्त करत प्रशासकीय कारभार सुधारण्यास प्रयत्न सुरू केला आहे. कामाचा दर्जा वाढवण्यावर भर दिला आहे. स्वतः पहाटे पाच वाजल्यापासून रात्री बारापर्यंत विकासाचा दौरा पायात पैंजण घालून दस्तूर खुद्द दादांनी बीड जिल्ह्यात सुरू केल्यामुळे विकासाची एक नवीन लहर बीडकरांना अनुभवायला मिळत आहे.त्यामुळे अविकसित पारतंत्र्यातून विकासाचे स्वातंत्र्य अनुभवायला मिळत आहे. असे म्हटले तरी वावगे ठरू नये. बीड जिल्ह्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थे वर भाजपा नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली वर्चस्व होते. आता या वर्चस्वाला छेद देत अजितदादांची राष्ट्रवादी काँग्रेस येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या घड्याळाची टिकटिक वाढवणार आहे. या दृष्टिकोनातून दादांनी बीड जिल्ह्यात विशेष लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येत आहे.



## जमियत उलेमा-ए-हिंद ची शिरूरकासार तालुका कार्यकारणीची फेरनिवड जाहीर

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर येथील जमियत उलेमा-ए- हिंद संघटनेची तालुका कार्यकारिणी ची बैठक संपन्न झाली असता कार्यकारणी ची फेरनिवड जिल्हाध्यक्ष मुफ्ती अब्दुल्लाह यांच्या उपस्थितीत झाली आहे. यावेळी तालुकाध्यक्ष मौलाना हाफिज अब्दुलजब्बार पठाण तर सरचिटणीसपदी फयाजभाई शेख,चिटणीसपदी अन्सर आयुब शेख,महंमदहुसेन उस्मान शेख(बाबा आतार), हाफिज अल्ताफ सय्यद,शौकत आतार सर,कोषाध्यक्ष जमीर अमीर बागवान,उपाध्यक्ष नजीर इस्माईल शेख,जमीर जिलानी बागवान,यासीन रहीम शेख,असिफ महंमद शेख यांची सर्वानुमते फेरनिवड करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष मौलाना मुफ्ती अब्दुल्लाह साहेब,मौलाना साबेर साहेब,मौलाना मुजीब साहेब, -वीं सर्फराज साहेब,हाफिज मन्सूर साहेब,मौलाना अज्मतुल्ला साहेब,मोहम्मद पाशा साहेब,अन्वर शेख,शरीफ शेख,गफुर आतार,खुद्बुद्दिन शेख आदि उपस्थित होते.

# भारतीयाच्या अस्मितेचा उत्सव

### बदनापूरात काढण्यात आलेल्या तिरंगा रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद




बदनापुर (प्रतिनिधी)

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष तथा आमदार श्री नारायण कुचे यांच्या उपस्थितीमध्ये आज भाजपा तर्फे बदनापूर शहरातून भव्य पदयात्रा काढण्यात आली या यात्रेची सुरुवात संत सावता महाराज मंदिर येथून होऊन छत्रपती शिवाजी महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून बदनापूर मार्केट कमिटी येथे समारोप करण्यात आला.

याप्रसंगी जालना जिल्हाधिकारी श्री अशिमा मित्तल मॅडम, तहसीलदार श्री तायडे साहेब, बदनापूर गटविकास अधिकारी श्री ज्योती राठोड मॅडम, गट शिक्षणाधिकारी श्री शिरसागर साहेब यांच्यासह १८ शाळांतील १० हजार विद्यार्थी विद्यार्थिनी महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनी व शिक्षक वृंद व देशभक्त नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.भव्य तिरंगा यात्रा जल्लोषात पार पडली.

सूर्याच्या पहिल्या किरणांप्रमाणेच तिरंग्याचे तेज संपूर्ण शहरभर पसरले होते. तिरंगा फडकवून, आपल्या राष्ट्रशक्तीचे प्रतीक असलेल्या या पवित्र ध्वजाला वंदन करण्यात आले, तसेच स्वतंत्र्य लढ्यातील क्रांतिकारकांसह शुरवीर भारतीय जवानांना अभिवादन करण्यात आले.ही तिरंगा यात्रा केवळ मिरवणूक नव्हती, तर आपल्या एकतेचा, अभिमानाचा आणि अमर देशप्रेमाचा संदेश होती.

# अंबड येथील तिरंगा पदयात्रेस नागरिकांचा उफुर्त प्रतिसाद

### आ. श्री नारायण कुचे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये तिरंगा पदयात्रा मोठ्या उत्साहात संपन्न

अंबड ।प्रतिनिधी

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर भाजपा तर्फे अंबड शहरातून भव्य पदयात्रा काढण्यात आली याप्रसंगी उपस्थित दिपक भैया ठाकूर, तारेख चाऊस, सौरभ कुलकर्णी, काकासाहेब कटारे, विठ्ठलसिह राणा, प्रदिप पवार, नसिर बागवान फेरोज शेख, बाळासाहेब तायडे, रमेश बुदेलखडे, बापूरात मामा खरात, अंबादास जाधव, बाळू खरात, गंगाधर वराडे, बाळू खरात सचिन खरात सचिन राठोड प्रकाश शेळके नरेश बुंदेलखंडे दत्ता जाधव भागवत गाडगे सुनील बीडे, जितू



परदेशी लक्ष्मण राक्षे प्रमोद राऊत गजानन उबाळे व प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते, देशभक्त, यांच्यासह २२ शाळांतील विद्यार्थी विद्यार्थिनी महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनी व शिक्षक वृंद व देशभक्त नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हि भव्य तिरंगा पदयात्रा आंदर श्री नारायण कुचे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये मोठ्या जल्लोषात पार पडली. सूर्याच्या पहिल्या किरणांप्रमाणेच तिरंग्याचे तेज संपूर्ण शहरभर पसरले होते. तिरंगा फडकवून, आपल्या राष्ट्रशक्तीचे प्रतीक असलेल्या या पवित्र ध्वजाला वंदन करण्यात आले, तसेच स्वतंत्र्य लढ्यातील क्रांतिकारकांसह शुरवीर भारतीय जवानांना अभिवादन करण्यात आले.ही तिरंगा यात्रा केवळ मिरवणूक नव्हती, तर आपल्या एकतेचा, अभिमानाचा आणि अमर देशप्रेमाचा संदेश होती.

## सुरज चव्हाण ची नियुक्ती करणाऱ्या तटकरे च्या तोंडाला काळे फासणार

### छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक रोमन यांचा इशारा

प्रतिनिधी । बीड

खासदार सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेच्या वेळी छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी पत्ते फेकल्याने तत्कालीन राष्ट्रवादीचे युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण आणि काही कार्यकर्त्यांनी मिळून विजयकुमार घाडगे यांना मारहाण केली होती. घाडगे यांना रुग्णालयात दाखल करावे लागले होते. या मारहाणीची दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सूरज चव्हाण याला पक्षातून निलंबित केले होते. मात्र सुनिल तटकरे यांनी पुन्हा सुरज चव्हाण याची नियुक्ती करून त्याला




मोठ पद दिल आहे. याचा निषेध छावा मराठा संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. सुनिल तटकरे बीडमध्ये आल्यानंतर त्यांच्या तोंडाला काळे फासू असा इशारा छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक रोमन यांनी दिला आहे.

२१ जुलैला अजित पवारांनी सूरज चव्हाण यांचे निलंबन केले. मात्र, या निलंबनाला तीन आठवडे होण्याच्या आधीच सूरज चव्हाणचे यांचे थेट पदोन्नती करत त्याची राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली. सुनिल तटकरे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले. चव्हाण यांना निलंबित केल्यानंतर पुन्हा त्यांच्यावर मोठी जबाबदारी टाकत सरचिटणीस केल्यानंतर सुनिल तटकरे यांच्यावर टीका होत आहे. छावाचे जिल्हाध्यक्ष अशोक रोमन यांनी या नियुक्तीवरून संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले मारामाऱ्या करणाऱ्यांना पक्षातून हाकालपट्टी करण्याऐवजी जर मोठं पद दिले जात असेल तर आम्ही- जेंव्हा केंव्हा सुनिल तटकरे बीडमध्ये येतील तेंव्हा त्यांच्या तोंडाला काळे फासणार आहोत.

## महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा दौरा

बीड ।प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे. दिनांक १५ ऑगस्ट रोजी सकाळी ७.०० वाजता शासकीय विश्रामगृह येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भेटीसाठी राखीव, सकाळी ८.५५ वाजता मोटारीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण. ९.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, नगर रोड बीड येथे आगमन. सकाळी ९.०५ वाजता भारताचा ७९ स्वातंत्र्य दिन संमारभ- ध्वजारोहण समारोहास उपस्थित राहतील. तसेच सकाळी १०.४५ वाजता रानभाजी कृषी कार्यक्रमाचे उद्घाटन करतील. सकाळी १०.५० वाजता रक्तदान शिबिराचे उद्घाटन करतील. दुपार नंतर मोटारीने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.



## वादळी वाऱ्यासह पावसामुळे सोलर पॅनलचे नुकसान

घनसावंगी ।प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे पिरगैबवाडी शिवारातील गट क्रं.१७८ मधील शेतकरी शेख निजाम अमीन यांच्या शेतातील यूलटेक एनर्जी कंपनीचा सोलार पॅनलचे वादळी वाऱ्यासह पावसाने पुर्णपणे फुटल्याने सध्या सोलार बंद पडले आहे.ज्यामुळे शेतकऱ्याचे खूप नुकसान झाले असून कंपनी कडून नुकसान भरपाई मिळण्याची अपेक्षा शेतकऱ्याकडून व्यक्त करण्यात आली आहे.

# आर्ट ऑफ लिविंग जालना च्या वतीने आनंद अनुभूती शिबिराचे भव्य आयोजन

जालना ।प्रतिनिधी

आर्ट ऑफ लिविंग परिवार जालना यांच्या वतीने महेश भवन, जालना येथे आनंद की अनुभूती या योग, प्राणायाम व ध्यान शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये तब्बल २०८ प्रशिक्षणार्थींनी उत्साहाने सहभाग नोंदवला. सहभागींसाठी रोज योग, प्राणायाम व ध्यानाचे सत्र घेतले जात असून, आधुनिक जीवनातील वाढता ताण-तणाव, नकारात्मक विचार व निराशा दूर करण्यासाठी योग ही एक प्रभावी जीवनशैली असल्याचा संदेश देण्यात येत आहे. संपूर्ण जगभरातील २१६ देशांमध्ये कार्यरत असलेली आर्ट ऑफ लिविंग संस्था विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून ऋषीमुनींच्या ज्ञानपरंपरेचा प्रसार करत आहे. याचाच एक भाग म्हणून, देशभरातील सर्व आर्ट ऑफ लिविंग केंद्रांवर १२ ऑगस्ट ते




१७ ऑगस्ट दरम्यान आनंद अनुभूती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार जालना शहरात महेश भवन येथे हे शिबिर भव्य स्वरूपात सुरू आहे. शहर व ग्रामीण भागात आर्ट ऑफ लिविंगचे कार्य सातत्याने वाढत असून, जीवनशैलीत सकारात्मक बदल घडविण्यासाठी लोक उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. योग, प्राणायाम, ध्यान याबरोबरच सामाजिक उपक्रमांद्वारे लोकांना या प्रवाहाशी जोडण्याचे कार्य संस्था करत आहे. हे शिबिर आर्ट ऑफ लिविंगचे वरिष्ठ प्रशिक्षक जय मंगल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असून, प्रशिक्षक म्हणून श्री अनिल खलसे, श्री सतीश तायडे, सौ. आरती ठाकूर, सौ. अंजली चिंतामणी, सौ. कविता वाबळे-शितोळे, श्री शिवाजी किंगरे, सौ. अर्चना जयस्वाल, सौ. सिंधुताई निर्वे यांनी योगदान दिले आहे. शिबिर यशस्वी करण्यासाठी साधक म्हणून अजित शितोळे, संदीप मगर पाटील, शशांक जयस्वाल, संतोष डोंगरकोस, नरेश भांदर्गे, महेश चव्हाण, सुरेखाताई चव्हाण, स्वाती अंडील, डॉ. आरती गायकवाड, अनिल वाघमारे, प्रशांत हीरप, नीरज मंत्री, विष्णू काळूसे, गीता काळूसे, अंजली ठाकूर, यमुना पालवे, सूरश्री अय्यर, वैभव देशपांडे, उमेश पूरी, साक्षी तायडे, ज्ञानेश्वर कबाडे, गंगा बुरांडे दिदी आदींचा सहभाग उल्लेखनीय राहिला. या शिबिराला जालन्यातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, पुढील काही दिवसांत अधिकाधिक लोकांना योग, प्राणायाम आणि ध्यानाचा लाभ घेण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे.

# बैलपोळा सणानिमित्त शेतकऱ्यांना 'समृद्धी'चा तिसरा हप्ता जाहीर


### १०० रुपये प्रति टन प्रमाणे जमा होणार उसाचे बिल

जालना ।प्रतिनिधी

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी दर देणारा समृद्धी साखर कारखान्याने बैलपोळा सणानिमित्त ऊस बिलाचा तिसरा हप्ता गुरुवारी जाहीर केला. गाळप हंगाम २०२४ -२५ मध्ये गाळप झालेल्या उसासाठी १००/ रुपये प्रति मे. टन प्रमाणे हा हप्ता शेतकऱ्यांना देण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी दिली.

समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांनी गाळप हंगाम २०२४ -२५ साठी शेतकऱ्यांच्या उसाला २९७०/ रुपये प्रती मे. टन प्रमाणे दर जाहीर केला आहे. त्यानुसार पहिला हप्ता २५००/ प्रती मे. टन प्रमाणे तर दुसरा हप्ता २००/ प्रती मे. टन प्रमाणे यापूर्वी कारखान्याने शेतकऱ्यांना अदा केला आहे. आता बैलपोळा सणानिमित्त १००/ रुपये प्रति मे. टन प्रमाणे तिसरा हप्ता देण्याचा निर्णय चेअरमन सतीश घाटगे पाटील यांनी घेतला असून लवकरच तिसऱ्या हप्त्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.

समृद्धी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या



हितासाठी नेहमीच प्रयत्नशील आहे. गाळप हंगाम २०२४ -२५ मध्ये गाळप झालेल्या शेतकऱ्यांच्या उसाला एफआरपी पेक्षा २७३ रुपये जास्तीचा दर देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. बैलपोळा हा शेतकऱ्यांसाठी सर्वात महत्वाचा सण आहे. शेतकरी हितासाठी या सणाच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी १०० रुपयांचा तिसरा हप्ता जाहीर केला आहे. लवकरच ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाणार आहे.

सतीश घाटगे पाटील,
चेअरमन समृद्धी साखर कारखाना

## संस्कार लाड सलग चौथ्या वर्षी ही सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा करणार

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी शहरातील छत्रपती शाहू महाराज निवासी दिव्यांग विद्यालयात दिव्यांग व निराधार विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करुन शुक्रवार दि. १६ आगस्ट २०२५ रोजी १९ वा वाढदिवस संस्कार राजेंद्र लाड साजरा करणार आहे. या दिवशी संस्कार लाड हा कसलाही सत्कार, शाल, श्रीफळ, हार न स्विकारता दिव्यांग बांधवांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करणार असून ही वडलोपार्जित परंपरा कायम सुरु ठेवणार आहे. तसेच संस्कार लाड हा सामाजिक भान राखून मागील दोन वर्षापासून सातत्याने सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा करत आहे.

आपण ही समाजाचे काही तरी देणे लागतो, या उद्दात हेतूने संस्कार लाड हा समाजसेवा करत आहे. समाजसेवेचा वारसा त्याने आपल्या वडिलांकडून घेतलेला आहे. त्याचे वडिल राजेंद्र लाड हे राज्यपुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक असून ते नेहमीच शैक्षणिक, सामाजिक, राष्ट्रीय, धार्मिक, साहित्य व दिव्यांग क्षेत्रातील कार्यात सततच अग्रेसर असतात. त्यांचाच वारसा घेवून संस्कार लाड हा ही त्यांच्या पावलावर पाऊल टाकून सामाजिक कार्य करत असतो. संस्कार हा त्याच्या वाढदिवसानिमित्त वायफट खर्च न करता अनाथ, मतिमंद, दिव्यांग निवासी शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे व खाऊचे वाटप करुन मित्र परिवार, बालगोपाळ यांच्या उपस्थितीत वाढदिवस साजरा करणार आहे.

सध्या सर्वत्र धुमधडाक्यात वाढदिवस साजरा करण्याची क्रेझ निर्माण झाली आहे. लहान मुलांपासून ते मोठ्या व्यक्तींपर्यंत सर्वांचेच वाढदिवस अतिशय धुमधडाक्यात केले



जात आहेत. यासाठी मोठा खर्च करण्यात येत आहे. अतिरेकी सजावट, फटाके वाजवणे, डिजे असा खर्च करण्याची सध्या चढाओढ निर्माण झाली आहे. मात्र सामाजिक आत्मभान ठेवून सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करणे प्रमाण कमी झाले आहे. माझा प्रत्येक वाढदिवस समाजोपयोगी व्हावा यासाठी मी प्रयत्न करतोय, त्यामुळे माझी आपणा सर्वांना विनंती आहे की, आपण देखील आपला वाढदिवस अश्याच सामाजिक कार्यातून साजरा करावा असेही शेवटी संस्कार लाड यांनी सांगितले आहे.

# मानूरच्या विकासासाठी आता कोणाला ही मुंबईला चक्कर मारण्याची गरज नाही, विकासाची जबाबदारी आता माझी - आ.सुरेश धस

## ग्रामपंचायत इमारतीच्या २५ लक्ष रुपये निधी सह विविध विकास कामांचा शुभारंभ, नागनाथ देवस्थानचे घेतले दर्शन,महेबुब सुभानी दर्ग्यावर चढवली चादर, तिसर्या श्रावणी सोमवार निमित्त भव्य दिव्य यात्रा

मानूर ।प्रतिनिधी

वीरशैव लिंगायत समाजाची काशी समजल्या जाणार्या श्री क्षेत्र नागनाथ मानूर येथे तिसर्या श्रावणी सोमवार निमित्त यात्रा उत्सव संपन्न झाला. ष.ब्र.१०८ श्री.गुरु विरुपाक्ष शिवाचार्य महाराज यांची हजारो भक्तांनी गावातून सवाद्य मिरवणूक काढली.मानूर येथील चार तरुणांनी १ हजार ३५० कि.मी.पायी प्रवास करुन काशी विश्वनाथ येथून पाण्याची कावड आणली होती. या पाण्याने नागनाथ महाराजांवर अभिषेक करण्यात आला. मानूर ग्रा.पं.च्या वतीने यात्रेच्या निमित्त गावातील यशस्वी भूमिपुत्रांचा सन्मान करण्यात आला. ही आदर्श परंपरा सरपंच अशोक मामा पाखरे यांनी नव्याने सुरु केली. मानूर येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कलंदर काका पठाण यांनी यात्रेचे औचित्य साधून विविध विकास कामांचा शुभारंभ केला. त्यासाठी आष्टी-पाटोदा-शिरुर मतदार संघाचे आ.सुरेश अण्णा धस आवर्जुन उपस्थित होते. आ.धस यांच्या हस्ते महेबुब सुभानी दर्ग्याच्या परिसरातील विकास कामांचा शुभारंभ झाला. या कार्यक्रमाला मानूरचे सुपुत्र तथा अहिल्यानगर येथील रेणुका स्टीलचे मालक उद्योगपती लिंबासेठ नागरगोजे आणि दै.दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

श्रावणातील तिसर्या सोमवारी मानूर येथे दरवर्षी यात्रा उत्सव आयोजित केला जातो. पंचक्रोषीसह राज्याच्या अनेक भागातून नागनाथ देवस्थानचे हजारो भक्त यात्रे निमित्त दर्शनासाठी येतात. मठाधिपती श्री.गुरु विरुपाक्ष शिवाचार्य महाराज यांची प्रथेप्रमाणे गावातून सवाद्य मिरवणूक काढली जाते. महाराजांच्या स्वागतासाठी प्रत्येक घरासमोर रांगोळ्या काढल्या जातात. सुवासिनी त्यांचे औक्षण करतात. गावातून तरुणांचा उत्साह शिगेला पोहचलेला असतो. अत्यंत भारावलेले आणि भक्तीमय असे वातावरण मानूरमध्ये पहायला मिळते. यावर्षीच्या यात्रा उत्साहामध्ये भाविकांची संख्या दरवर्षी पेक्षा कितीतरी पटीने अधिक होती.मानूर येथील शिवभक्त श्री.उमेश घोडके, वैजिनाथ सोलनकर, जालिंदर कदम आणि नागेश जायभाय या चार युवकांनी मानूर ते काशी असा १ हजार ३५० किलोमिटर प्रवास पायी करुन गंगेचे पाणी कावडीने आणले. नागनाथ महाराजांवर अभिषेक करण्यासाठी हे पाणी आणण्यात आले होते.

मानूर ग्रा.पं.च्या वतीने सरपंच अशोक मामा पाखरे यांनी काशी विश्वनाथ येथून गंगेचे पाणी घेवून येणार्या गावातील जिगरबाज तरुणांचा सन्मानचिन्ह देवून जाहिर सत्कार केला. त्याच बरोबर मानूरच्या ज्या भूमिपुत्रांनी वेगवेगळ्या क्षेत्रात यश संपादन केले आहे त्यांचाही यात्रे निमित्त सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. आष्टी-पाटोदा-शिरुर मतदार संघाचे आ.सुरेश अण्णा धस यांनी मानूर येथे भेट देवून नागनाथ देवस्थानचे दर्शन घेतले. तसेच त्यांच्या हस्ते महेबुब सुभानी दर्ग्याच्या परिसरातील विकास कामांचा शुभारंभ झाला. गावचे उपसरपंच मोहब्बत पठाण



### विरुपाक्ष शिवाचार्य महाराजांची गावातून सवाद्य मिरवणूक

यांच्या नेतृत्वाखाली गावातील मुस्लीम समाजाच्या वतीने आ.सुरेश अण्णा धस यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. तसेच त्यांची गावातून मिरवणूक सुध्दा काढण्यात आली. विकास कामांच्या उद्घाटन समारंभाला आ.धस यांच्या समवेत लिंबासेठ नागरगोजे, संतोष मानूरकर, सरपंच अशोक मामा पाखरे, बाबुसेठ नागरगोजे, यशरबभाई सय्यद, कारभारी मामा कदम, शिरुर पं.स.चे माजी सभापती बाबुराव केदार, जि.प.सदस्य माऊली अप्पा जरांगे, भाजपाचे तालूकाध्यक्ष सुरेश उगलमुगले, ठेवीदार बचाव समितीचे प्रमुख प्रा.सचिन उबाळे, दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी, शेषनारायण खरमाटे आदि मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन श्री.उल्हास पाखरे सर आणि कैलास तुपे यांनी केले.

### आ.सुरेश अण्णा धस यांनी विविध मागण्या मान्य केल्या

मानूर व परिसरातील विकासाच्या काही प्रमुख मागण्या सरपंच अशोक मामा पाखरे आणि कलंदर काका पठाण यांनी केल्या. यामध्ये मानूर येथे आरोग्य उपकेंद्र सुरु करावे, मानूर ते टाकळी नदीवर पुल बांधावा,राजुरी ते चिंचपुर रस्त्यावर गतीरोधक बसवावा, मानूर ते मुलानी वस्ती रस्ता, मानूर ते टाकळी रस्ता, मानूर ते तिनखडी या रस्त्यांचे प्रश्न तसेच श्री क्षेत्र नागनाथ देवस्थान , श्री क्षेत्र सिध्देश्वर देवस्थान आणि श्री क्षेत्र रामचंद्र देवस्थान येथील विकास कामांचे प्रश्न तातडीने मार्गी लावू असे आ.सुरेश अण्णा धस यांनी सांगितले.

### ऊसतोडणीचे काम भविष्यात बंद होणार पण काळजी करू नका...

आ.सुरेश अण्णा धस यांनी मानूर येथील कार्यक्रमात बोलतांना अत्यंत महत्वाची माहिती दिली. या परिसरात ऊसतोड कामगारांची संख्या अधिक आहे. येणार्या दोन -तीन वर्षात ऊसतोडणीचे काम पुर्णत: बंद होणार आहे. हे काम अत्याधुनिक यंत्राव्दारे होवू लागले आहे. लातूरच्या मांजरा परिवारातील सर्व साखर कारखान्यामध्ये याच यंत्राव्दारे उसतोडणी करण्यात आली. त्यामुळे वर्षानुवर्ष उसतोडणीचे काम करणार्या मजुरांनी आता नवा व्यवसाय शोधण्याची गरज असले तरीदेखील ऊसतोड मजुरांनी चिंता न करता पर्यायी सक्षम मार्ग शोधावा आम्ही खंबीरपणे साथ देऊ असा विश्वास आ.धस यांनी दिला.

### शेकडो मैल कावडी सोबत चालली एक प्रामाणिक कुत्री... दैवत मानून ग्रामस्थांनी कुत्रीचे केले पूजन...

मानूर येथील शिवभक्त उमेश घोडके, वैजिनाथ सोलनकर, जालिंदर कदम आणि नागेश जायभाय या चार युवकांनी मानूर ते काशी असा १ हजार ३५० किलोमिटर प्रवास पायी करुन गंगेचे पाणी कावडीने आणले. या पाण्याने तीर्थक्षेत्र मानूर येथील जाज्वल्य देवस्थान असलेल्या नागनाथ महाराजांवर अभिषेक करण्यात आला.या प्रवासा दरम्यान चौघा पैकी एकाला अचानक अर्धवट प्रवास सोडून जावे लागले. ज्या दिवशी तो गेला त्याच दिवशी एक कुत्री या तिघांच्या सोबत पायी चालू लागली ती कुठून आली ? कशी आली ? कसलीच माहिती या तिघांनाही नव्हती. थोडसं चालेल आणि थांबेल असं या तिघांना वाटलं. बघता बघता ती शेकडो मैल यांच्यासोबत चालू लागली.तिच्या पायाला फोड आले तिला पुढे चालणे अवघड झाले.तरीसुद्धा ती यांच्यासोबत चालत होती. तिच्या होणाऱ्या असह्य वेदना लक्षात घेऊन या तिघांनी तिला याच मार्गावरून गावातील एक गाडी जात असताना त्या गाडीमधून तिला गावाकडे म्हणजेच मानूर येथे पाठवले. योगायोग असा की ज्या दिवशी कुत्री सकाळी गाडीने पाठवली त्याच दिवशी बाहेर गेलेला तरुण पुन्हा दुपारनंतर वापस अचानक आला. आणि तो शेवटपर्यंत कावड यात्रेत राहिला. अश्या प्रकारे संपूर्ण प्रवास हा तिघांनी न होता अखेर चौघांनीच पूर्ण झाला. या सुवर्ण योगायोगाची पंचक्रोशीत चर्चा असून त्या दैवत होऊन आलेल्या कुत्रीचे दर्शन घेण्यासाठी तिला पाहण्यासाठी अनेक भाविक भक्तांच्या रांगा लागत आहे हे विशेष...

# शारदा इंग्लिश स्कूलच्या विरोधात पालक १५ ऑगस्ट रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करणार आमरण उपोषण

केज/प्रतिनिधी

केज शहरात नावाजलेले सुप्रसिद्ध म्हणून शारदा इंग्लिश स्कूलची ओळख आहे. या इंग्लिश स्कूलने चि. प्रतीक महादेव कराड या विद्यार्थ्याचे पुढील एडमिशन साठी टीसी व मार्कमेमो दिला नाही यामुळे विद्यार्थ्यांचे पालक महादेव सोपान कराड हे दि.१५ ऑगस्ट रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसणार आहेत.याबाबत सविस्तर वृत्त असे की, चि.प्रतीक महादेव कराड राहणार तांबवा तालुका केज जिल्हा बीड येथील रहिवासी असून या मुलाचे शिक्षण पहिली ते दहावी शारदा इंग्लिश स्कूल केज या ठिकाणी झाले आहे.दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर त्याचा नंबर स्व.प्रमोद महाजन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बनकरंजा येथे लागला होता परंतु, शारदा इंग्लिश स्कूल ने या विद्यार्थ्यांचा टीसी व मार्क मेमो न दिल्यामुळे शासनाने दिलेल्या दि. ०८ आगष्ट २०२५ या तारखेत प्रवेश झाला नाही. त्यानंतर दिनांक ११ आगष्ट २०२५ रोजी पर्यंत शासनाकडून ऍडमिशन साठी तारीख



वाढविण्यात आलेली आहे.परंतु शारदा इंग्लिश स्कूलने चि. प्रतीक महादेव कराड या विद्यार्थ्यांचा अध्याप पर्यंत टीसी व मार्क मेमो दिलेला नाही यामुळे पालकावर आमरण उपोषणाची वेळ आलेली आहे.आपल्या पाल्याचा टीसी व मार्क मेमो मिळावा यासाठी महादेव सोपान कराड हे दि.१५ ऑगस्ट रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालय येथे आमरण उपोषणास बसणार आहेत.


# स्वामी विवेकानंद विद्यामंदिर या शाळेतील विद्यार्थ्यांचे वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेमध्ये निर्विवाद वर्चस्व



केज/प्रतिनिधी

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेतील विद्यार्थ्यांनी धारूर येथील कै.भास्करराव शिनगारे यांच्या २६ व्या स्मृतिदिनानिमित्त वक्तृत्व व वादविवाद स्पर्धमध्ये घवघवीत यश संपादन केले.या स्पर्धेच्या दोन्ही गटातून प्रथम पारितोषिक पटकावून शाळेच्या सांस्कृतिक विभागामध्ये आणखीन एक मानाचा तुरा रोवला आहे. यामध्ये वक्तृत्व स्पर्धेत लहान गटातून स्वरा विठ्ठल बोराडे हिने तर मोठ्या गटातून वादविवाद स्पर्धेमध्ये आदित्य हनुमंत सूर्यवंशी व संस्कृती भारत जाधव त्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.तसेच मानसी धनराज सूर्यवंशी हिला सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले तेव्हा याप्रसंगी यशस्वी विद्यार्थ्यांचा जीवन विकास शिक्षक मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, सचिव जी.बी.गदळे, काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते तथा माजी नगरसेवक मौला सौदागर,पालक भारत जाधव,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा शैलाताई इंगळे,शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे आदींनी सन्मानपत्र,रोख पारितोषिक व फिरते चषक देऊन सत्कार केला.

कै.भास्करराव शिनगारे यांच्या २६ व्या स्मृतिदिनानिमित्त धारूर येथे दि.१३ ऑगस्ट २०२५ रोजी वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेमध्ये स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेतील विद्यार्थ्यांनी दोन्ही गटातून घवघवीत यश संपादन केले. ५ वी ते ७ वी गटातून वक्तृत्व स्पर्धेत स्वरा विठ्ठल बोराडे हिने प्रथम क्रमांक पटकावला. बक्षिसाचे स्वरूप रोख ३००० रुपये प्रमाणपत्र व चषक तसेच ८ वी ते १० वी गटातून वादविवाद स्पर्धेत चि.आदित्य हनुमंत सूर्यवंशी याने अनुकूल व संस्कृती भारत जाधव हिने प्रतिकूल बाजू मांडून प्रथम क्रमांक पटकावला बक्षिसाचे स्वरूप रोख ५००० रुपये प्रमाणपत्र व चषक संपादन केले. तसेच मानसी धनराज सूर्यवंशी हिला सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले.वरील यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेतील सहशिक्षक दत्ता सत्वधर सर व प्रबोधकांत समुद्रे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रबोधकांत समुद्रे यांनी मानले.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# हारेगा टीबी जितेगा इंडिया!

## मंठा तालुक्यात ९१ जणांची क्षयरोग तपासणी

डॉ. आशिष तिवारी / मंठा

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन अभियानाच्या अंतर्गत मंठा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ढोकसाळ येथे विशेष क्षयरोग तपासणी शिबीर घेण्यात आले. यामध्ये ९१ रुग्णांची क्ष-किरण तपासणी आणि थुंकी नमुना तपासणी करण्यात आली.

सन २०२६ पर्यंत भारत क्षयरोगमुक्त करण्याचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला असून, त्याचाच भाग म्हणून हा उपक्रम राबवण्यात आला.

या शिबिराचे आयोजन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. गोपाल कुंडलीकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जगन्नाथ कुंडकर आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेंद्र गायके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप हजारे यांची विशेष उपस्थिती होती.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी आरोग्य सहाय्यक सुजीत वसंतराव वाघमारे, विलास देशमुख, अशोक आढे, अमर झोल, तालुका क्षयरोग पर्यवेक्षक अशोक अभुरे, आरोग्य कर्मचारी अभिजीत मेखले, अशोक जावळे, संजय बुधवंत, करण पोले, भारत पांडे, स्वप्निल पोले, धोंडीबा फुपाटे, गोविंद नवले आणि गजानन जाधव यांनी परिश्रम घेतले.

या विशेष शिबिरामुळे गावातील लोकांना वेळेत निदान व उपचाराची सुविधा मिळाली असून, हारेगा टीबी जितेगा इंडिया या घोषणेसह आरोग्य विभागाने क्षयरोगमुक्त भारताच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले आहे.



# वीज ग्राहकांवर स्मार्ट मीटरचा 'शॉक'!

देगलूर/प्रतिनिधी

राज्यात गेल्या दोन-तीन महिन्यांपासून वीज ग्राहकांना अचानक प्रचंड वीजबिलाचे 'शॉक' बसत आहेत. या अवास्तव बिलांच्या तडाख्याने आधीच हैराण झालेले ग्राहक तक्रारीसाठी महावितरणच्या दारात धावत आहेत. मात्र, तक्रार केल्यावर 'नवीन स्मार्ट मीटर बसवून घ्या' असा सल्ला देऊन महावितरण त्यांची आणखी कोंडी करत असल्याची चर्चा आहे.

हे स्मार्ट मीटर अदाणी व इतर खासगी कंपन्यांचे असून, गरज नसताना बळजबरीने बसवण्याचा डाव सुरू असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे. शहर असो वा खेडी, बहुसंख्य ग्राहक या मीटरच्या नावाने घाबरले आहेत. पुढे बिलात आणखी वाढ होईल या भीतीने लोक नाखूष आहेत. त्यातच महावितरणचे काही अधिकारी-पदोन्नत कर्मचारी, पूर्वसूचना न देता रातोरात जुन्या मीटरच्या जागी नवे मीटर लावून ग्राहकांना अंधारात ठेवत असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत.

ग्रामीण व शहरी भागात या प्रकाराविरोधात असंतोष उसळला असून, परिस्थिती अशीच राहिली तर उग्र जनआंदोलन होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शेतकरी आणि घरगुती ग्राहक या दोन्ही वर्गांमध्ये चिंता पसरली आहे. जाणकारांचे मत आहे की, आधीच महागाईच्या फटक्यात सापडलेल्या नागरिकांवर हे स्मार्ट मीटर म्हणजे आणखी एक विजेचा फटका ठरणार आहे. महावितरणने पारदर्शकतेने या मीटरचे खरे



परिणाम आणि बिलवाढीमागील कारण स्पष्ट करावे, अशी सुज्ञ ग्राहकांची मागणी आहे.

# रविवारी परभणीत अभेद अभिषेकी यांचे शास्त्रीय गायन

## नाद ज्योती त्रैमासिक संगीत सभा

परभणी/प्रतिनिधी

ज्ञानेश ध्रुपद संगीत व शिक्षण प्रसारक संस्था आणि परभणी शहर महापालिका यांच्या संयुक्त विद्यमानाने नाद ज्योती त्रैमासिक संगीत सभेचे रविवारी (दि.१७) सायंकाळी ७ वाजता येथील बी.रघुनाथ सांस्कृतिक सभागृहात आयोजन करण्यात आले आहे. या त्रैमासिक संगीत सभेत अभेद अभिषेकी, मयंक व अभिराम परळीकर यांचे शास्त्रीय गायन होणार आहे.

यावेळी गीत इनामदार तबला, ऋतुराज भोसले पखवाज, मंगेश जवळेकर हार्मोनियम साथसंगत करणार आहेत. या संगीत सभेचे उद्घाटन पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्याहस्ते होणार आहे. संगीत सभेत उपस्थित राहण्याचे आवाहन ज्ञानेश ध्रुपद संगीत व शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ऋतुराज भोसले आणि महापालिका आयुक्त यांनी केले आहे. या संगीत कार्यक्रमास पुरस्करते प्रायजोक म्हणून शिवम मसाले आणि विठ्ठल डेव्हलपर्स व बिल्डर्स नंदकिशोर डोंबे पाटील हे आहेत. तर अन्न प्रायोजक म्हणून जिजाऊ रेस्टोरंटचे गणेश निर्मळ पाटील हे आहेत.




# गौड कलाल समाज संघटनेच्या नांदेड जिल्हाध्यक्षपदी डॉ. श्रीहरी बुडगेमवार

मुखेड /प्रतिनिधी

मुखेड येथील प्रख्यात रेडिओलॉजी तज्ञ डॉ. श्रीहरी राजाराम बुडगेमवार यांची जय गौड उद्यमम कलाल समाज संघटनेच्या नांदेड जिल्हाध्यक्षपदी निवड झाली आहे. हैद्राबाद येथे सरदार पापन्ना गौड महाराज यांच्या ३७५ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

या वेळी तेलंगणा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष ना. महेश कुमार गौड, परिवहन मंत्री पोनम प्रभाकर गौड, राज्य उत्पादन शुल्क मंत्री श्रीनिवास गौड, माजी खासदार भरत गौड, राष्ट्रीय अध्यक्ष अ‍ॅड. डॉ. व्ही. रामाराव गौड, प्रदेशाध्यक्ष नारायण गौड सिल्लेवार यांसह मान्यवर उपस्थित होते.

निवडीबद्दल विदर्भ गौड कलाल समाज महासंघाचे अध्यक्ष नारायण गौड, महासचिव मल्लेशम गौड, तसेच गोंदिया, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, भंडारा जिल्ह्यांतील समाज संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानाची आहे. नांदेड जिल्ह्यातील गौड कलाल समाजाच्या एकोपा, प्रगती आणि शिक्षण-रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी मी पूर्ण क्षमतेने प्रयत्न करणार आहे. संघटना मजबुतीकरणाकडे प्रयत्नशील राहीन समाजातील तरुणांना योग्य दिशा देणे आणि महिलांच्या सक्षमीकरणावर भर देणे हे माझे प्राधान्य राहील, असे डॉ. बुडगेमवार यांनी सांगितले.



# अंथरवण पिंपरी आश्रम शाळेत शालेय गणवेश व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न

बीड ।प्रतिनिधी

बीड पासून जवळच असलेल्या श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ बीड संचलित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा तथा दीनानाथ बालक आश्रम अंथरवण पिंपरी (तांडा) ता. बीड येथे दिनांक १३ ऑगस्ट २०२५ बुधवार रोजी शालेय गणवेश व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न झाला.



या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य खंदारे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष दिनेशराव पवार, मुख्याध्यापक शिंदे सर, पर्यवेक्षक जवरे सर हे व्यासपीठावर अग्रस्थानी होते. सर्वप्रथम हरितक्रांतीचे प्रणेते कै.वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. तदनंतर मान्यवरांच्या शुभहस्ते निवासी व दीनानाथ बालकाश्रमच्या विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दिनेशराव पवार म्हणाले की, मिळालेल्या शैक्षणिक साहित्याचा योग्य वापर करून नियमितपणे अभ्यास करावा. कठोर परिश्रम जो करेल तोच यशाची फळे चाखेल. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे व्ही.एन. यांनी तर आभार प्रदर्शन पवार सर यांनी मानले. या कार्यक्रमास पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आश्रम शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



बीड : माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल तळेगाव, बीड येथील १५० विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व संध्येला मानवी साखळी द्वारे आय लव्ह इंडिया असे घोषवाक्य संचालक ज्ञानेश्वर तांबे, नम्रता तांबे, मुख्याध्यापिका सारिका जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केली.

# रस्ता अडविल्याने वृद्ध देशपांडे यांचे उपोषण

## कमलाकर खुळे यांना सुनावणीची नोटीस

बीड ।प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील कोळपिंपरी येथील वडिलोपार्जित जमिनीवर जाणारा रस्ता अडविल्याने वृद्ध अनंतराव देशपांडे यांचे गुरुवारी (दि. १४) दुसऱ्या दिवशीही उपोषण सुरु आहे. त्यांची जिल्हा रुग्णालयात नेऊन वैद्यकीय तपासणी करुन उपचार करण्यात आले. त्यांची प्रकृती स्थिर आहे. गावातील कमलाकर खुळे याने रस्ता अडविल्याने श्री. देशपांडे उपोषणाला बसले आहेत. याबाबत दि. २८ रोजी धारुर तहसिलदारांनी सुनावणी ठेवली आहे. दगडगोटे टाकून रस्ता अडविल्याने शेतात जाण्यासाठी वाट नाही, असे अनंतराव देशपांडे यांनी निवेदनात म्हटले आहे. त्यांच्या भावाची जमिन खरेदी करणाऱ्याने हा रस्ता अडविल्याचा आरोप आहे. चार वर्षांपासून धारुर तहसिलला तक्रारी करुनही न्याय न मिळाल्याने त्यांनी उपोषण सुरु केले. दरम्यान, त्यांचे भाऊ गुणवंत देशपांडे यांनी २० वर्षांपूर्वीच सदर जमिन विकली आहे. सदर जमिन खरेदी करणाऱ्याने रस्ता अडविल्याची अनंतराव देशपांडे यांची तक्रार आहे. तक्रारीच्या अनुषंगाने धारुर तहसिलदारांनी काढलेल्या पत्रावरुन संभ्रम तयार करुन काही लोकांकडून माध्यमांना त्यांच्या भावाने रस्ता अडविल्याची चुकीची माहीती दिली. दरम्यान, या प्रकरणी ता. २८ ऑगस्ट रोजी धारुर तहसिलदारांनी सुनावणी ठेवली आहे. कमलाकर खुळे यांना स्वत: हजर राहून अथवा वकिलांमार्फत म्हणणे मांडावे असे या मंडळअधिकारी व तलाठी यांच्या मार्फत काढलेल्या नोटीसीत म्हटले आहे.

# तुलसी महाविद्यालयात 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत ध्वजारोहण

कला व ज्ञानस्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी जागवला राष्ट्रप्रेमाचा संदेश

बीड ।प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात गुरुवार, दि. १३ आणि १४ ऑगस्ट रोजी सकाळी ७.४५ वाजता 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत ध्वजारोहण सोहळा उत्साहात पार पडला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे,




डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम महाविद्यालय, नेकनूरचे प्राचार्य प्रा.डॉ.विजयकुमार बांदल, नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य प्रा.डी.डी.राऊत, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.प्रकाश ढोकणे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

हर घर तिरंगा अभियान २ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ दरम्यान संपूर्ण देशभर राबवले जात आहे. या अनुषंगाने महाविद्यालयात देशभक्तीपर वातावरण निर्मितीसाठी विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यात रांगोळी, मेहंदी, प्रश्नमंजुषा, पीपीटी, कोडिंग आणि संगणक आधारित स्पर्धांचे आयोजन करण्यात आले, ज्यांतून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला व राष्ट्रप्रेमाचा संदेश प्रकट केला.या आयोजित स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव उद्या, १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात करण्यात केला जाणार असल्याचे प्राचार्यांनी कळवले.

या संपूर्ण कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सांस्कृतिक विभाग तसेच संगणक व मॅनेजमेंट विभाग यांचे मोलाचे सहकार्य लाभले. महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# फाळणीच्या व्यथा अत्यंत वेदनादायी - प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी

लातूर ।प्रतिनिधी

भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी देशांमध्ये आनंद व दुःख या दोन्ही भावना एकाच वेळी सर्वत्र अविष्कृत होत होत्या याचे कारण म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश जरी स्वतंत्र झालेला असला तरी १४ ऑगस्ट १९४७ रोजी झालेल्या फाळणी व पाकिस्तान निर्मितीमुळे देशात सुरू झालेले जातीय, धार्मिक दंगे हे अमानवीय स्वरूपाचे होते त्यामुळे फाळणीच्या व्यथा या अत्यंत वेदनादायी स्वरूपाच्या होत्या असे प्रतिपादन वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले. महात्मा बसवेश्वर शिक्षण



संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात फाळणी दुःखद स्मृती दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.यावेळी विचारपीठावर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य सौ. वनिता पाटील, इतिहास विभाग प्रमुख डॉ. सदाशिव दंदे, प्रा. मनोज वैरागकर आणि के. आर. सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, फाळणीचा दिवस हा सर्वांसाठी क्लेशदायक होता तथापि आज आम्ही सर्वांनी संविधानातील धर्मनिरपेक्ष तत्त्वाचा सामूहिक जीवनात अंगीकार करून राष्ट्रीय एकात्मता जोपासणे आवश्यक आहे. यावेळी सकाळच्या सत्रामध्ये उपप्राचार्य सौ. वनिता पाटील यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ध्वजारोहण केले आणि कार्यक्रमामध्ये सामूहिक पसायदान गायले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य सौ. वनिता पाटील यांनी केले तर आभार प्रा. एन. ए. गोरे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभम बिराजदार, संदीप मोरे आणि महेश स्वामी यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# किसनभाऊ राठोड व सुनिल महाराज यांनी घेतली गृहमंत्री अमितजी शहा यांची दिल्लीत सदिच्छा भेट- रामेश्वरभाऊ नाईकांचा पुढाकार

बीड प्रतिनिधी

हिंद की चादरश्री गुरु तेग बहादुर सिंग यांची ३५० वी शहीदी समागम निमित्त बंजारा,सिख,लबाना, सिकलगरी व मोहीयाल समाजाचे माहे नोव्हेंबर २०२५ नांदेड नागपूर व मुंबई येथे विराट स्वरुपात एकत्रित महासंमेलन संपन्न होणार आहे.या सम्मेलन प्रसंगी मार्गदर्शन करण्यासाठी भारताचे धाडसी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब,केंद्रीय गृहमंत्री अमितजी शहा साहेब व उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथजी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

सदरील नियोजित सम्मेलनाचे नियोजित मुख्य अतिथी तथा केंद्रीय गृहमंत्री आदरनिय अमितजी शहा साहेब यांना अधिकृत निमंत्रण देण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे प्रमुख आदरनिय रामेश्वरभाऊ,

राष्ट्रीय बंजारा परिषदेचे संस्थापक समन्वयक,बंजारा तिर्थक्षेत्र बारा धामचे निर्माते, भगवंत सेवक तथा देशातील



बंजारा समाजाचे लक्षवेधी नेते आदरनिय किसनभाऊ राठोड,लबाणा समाजाचे धर्मगुरू परमपूज्य सुरेश महाराज व पोहरादेवी येथील प.पू.महंत सुनील महाराज यांनी दिल्ली येथील शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन निमंत्रण दिले व जवळपास अर्धा तास सामाजिक सास्कृतिक धार्मिक व राजकीय विषयांवर सविस्तर चर्चा केली.या भेटीमुळे बंजारा समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

तसेच शिख,शिकलगरी मोहीयाल समाजाच्या शिष्टमंडळाने देखील मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे प्रमुख तथा गोद्री कुंभमेळ्याचे संयोजक आदरनिय रामेश्वरभाऊ नाईक यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय गृहमंत्री अमितजी शहा साहेब यांची भेट घेऊन निमंत्रण दिले.सम्मेलनाला नक्की उपस्थित राहील असे आश्वासन गृहमंत्री अमितजी शहा यांनी शिष्टमंडळाला दिले आहे.

या शिष्टमंडळात श्री.सुखविंदर सिंग,श्री.हॅपी सिंगजी, श्री.जसपाल सिंग यांचा समावेश होता.बंजारा समाजाच्या वतीने पारंपरिक पद्धतीने कवलपट्टा व कवड्याची माळ घालून केंद्रीय गृहमंत्री अमितजी शहा साहेब यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.भगवंत सेवक किसनभाऊ व महंत सुनील महाराज यांनी गोवा राज्याचे मुख्यमंत्री नामदार प्रमोद सावंत यांची देखील भेट घेऊन गोव्यातील बंजारा समाजाच्या सामाजिक शैक्षणिक व राजकीय विषयांवर सविस्तर चर्चा केली.

# जुगार अड्डावर स्थानिक गुन्हे शाखेचे स्वातंत्र्याच्या पूर्वदिनी छापे

## ११ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून २४ आरोपींवर कारवाई केल्याने जुगाऱ्यांमध्ये खळबळ !

बीड ।प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बीड जिल्हामध्ये चालणाऱ्या अवैध धंद्याची माहीती काढुन कारवाई करण्याचे आदेशित केल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका दिवसात तीन जुगार अड्डावर छापा मारुन कारवाई केली. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने याचे पथकाने पोलीस ठाणे केज हद्दीत नांदुरघाट येथे दिक्षा किराणाच्या मागे चालणाऱ्या तिरट नावाचा जुगारावर छापा मारुन आरोपी बबलु सत्तार शेख, वय ३१ वर्ष, रा नांदुरघाट,अविनाश तुकाराम लोंढे, वय ३० वर्ष, नवनाथ निवृत्ती मगरे, वय ३८ वर्ष, बबन एकनाथ गायकवाड, वय ७० वर्ष, आकाश बापु शिंदे, वय २३ वर्ष, सुशिल शिवाजी त्रिमुखे, वय ४३ वर्ष, प्रकाश गेणबा जाधव, वय ४० वर्ष, चंदु दशरथ जाधव, वय ३० वर्ष, ऋषिकेश भिमा गायकवाड, वय २२ वर्ष, सर्व रा नांदुरघाट व विनोद देविदास हांगे, वय ३१ वर्ष, रा हांगेवाडी, ता. केज यांना पकडून त्याचे ताब्यातून तिरट जुगाराचे साहीत्य, नगदी, मोबाईल, मोटार सायकल असा एकुण २,६३,०६० मुद्देमाल हस्तगत करुन त्याचे विरुधद पोलीस ठाणे केज गु.र.नं ४३७/२०२५ कलम १२ (अ) मु.जुका प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.



तसेच त्याच पथकाने पोलीस ठाणे दिंद्रुड हद्यीत तेलगांव ते परळी रोडलगत ईसार पेट्रोलपंपाचे मागे तिरट जुगार खेळणाऱ्या आरोपी दत्ता मधुकर लगड, वय ४२ वर्ष, अक्षय सुरेश लगड, वय २८ वर्ष, सचिन नारायण कटारे, वय ४५ वर्ष, पोपट प्रकाश सोनवणे, वय ३३ वर्ष,बळीराम नामदेव तिडके, वय ४५ वर्ष,अंकुश लक्ष्मण लगड, वय ४५ वर्ष सव रा तेलगांव याना पकडुन त्याचे ताब्यातुन नगदी, जुगाराचे साहीत्य, मोटार सायकल मोबाईल असा एकुण २,१२,७०० रु मुद्देमाल जप्त करुन त्याचे विरध्द पोलीस ठाणे दिंद्रुड गु.र.नं २१२/२०२५ कलम १२ (अ) मुजुका प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

तसेच पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर याचे पथकाने पोलीस ठाणे पेठ बीड येथील नागोबा गल्ली येथे तिरट नावाचा जुगार चालणाऱ्या अनुयावर छापा मारुन आरोपी अब्दुल फईल जलीम मोमीन, वय ४८ वर्ष, कृष्णा अशोक परळकर, वय २३ वर्ष, वैभव पांडुरंग तांगडे, वय २५ वर्ष, अमित शरद जोगदंड, वय २१ वर्ष, अकबर मुसा खॉन, वय ३९ वर्ष, राजु रवी क्षीरसागर, वय ३२ वर्ष,संकेत चंद्रकांत तांगडे, वय २८ वर्ष, शेख अमेर शेख अन्सार, वय २८ वर्ष, सर्व रा बीड यांना पकडुन त्याचे ताब्यातुन दुचाकी, मोबाईल, नगदी असा एकुण ६,३५,५७० रू मुद्देमाल हस्तगत करुन त्याचे विरुधद पोलीस ठाणे पेठ बीड गुर.नं २२८/२०२५ कलम ४,५ मु.जु.का प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे

सदरील कामगिरी श्री नवनित काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार, महेश जोगदंड, आनंद म्हस्के, विकास राठोड, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, बप्पासाहेब घोडके, अर्जुन यादव, आशपाक सय्यद, मनोज परजणे, चालक नितीन वडमारे, सुनिल राठोड, गणेश मराडे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

# राजवीरच्या आकस्मिक निधनाने शिवाजीनगर परिसरात शोककळा

बीड ।प्रतिनिधी

येथील राजस्थानी विद्यालयात इयत्ता सहावी वर्गात शिक्षण घेत असलेल्या अत्यंत चुणचुनीत व हजर जबाबी विद्यार्थी चि. राजवीर ज्ञानेश्वर शिंदे यांच्या आकस्मिक निधनाने शाळा, शिवाजीनगर परिसरात बुधवारी शोककळा पसरली तर सर्वत्र दुःख व्यक्त करण्यात आलं.

शिवाजीनगर परिसरात राहणारे ज्ञानेश्वर शिंदे व वर्ष न्यानेश्वर शिंदे यांचा मुलगा राजवीर राजस्थानी विद्यालयात इयत्ता सहावी वर्गात शिक्षण घेत होता अतिशय हुशार व चाणाक्ष कुशाग्र बुद्धिमत्तेचा म्हणून सर्व दूर परिचित होता .दिनांक १२ ऑगस्टला त्याला ताप आल्याचं व हा ताप डोक्यात उतरल्याचं उपचार करणारे डॉ.जाणवळे यांच्या लक्षात आलं त्यांनी उपचार केले मात्र प्रतिसाद मिळाला नाही नंतर पालकांनी राजविरला गीताई हॉस्पिटलमध्ये दाखल केले मात्र राजवीरची प्रकर्ती गंभीर झाली व त्यातच उपचार सुरू असताना १३ ऑगस्टला दुपारी १२:३० वाजता त्याचं दुःखद निधन झालं. त्याच्यावर भगवान बाबा प्रतिष्ठान येथे जड अंतकरणाने अंत्यसंस्कार करण्यात आले.



# विना परवाना रस्ता खोदून शासनाचे नुकसान करणाऱ्या अधिकारी व गुत्तेदारांवर गुन्हा दाखल करा

## या मागणीसाठी अंबाजोगाईत जीवन गायकवाड यांचे आमरण उपोषण ; उपोषणाचा तिसरा दिवस

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

एनएच-५४८ डी हा लोखंडी सावरगाव ते सनगाव ग्रामीण रस्ता क्रमांक-११९ विना परवाना रस्ता खोदून जिल्हा परिषद विभागाचे अंदाजे ३० लाख रूपयांचे नुकसान करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता व संबंधित गुत्तेदारांवर गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी अंबाजोगाईत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड यांनी १२ ऑगस्ट पासून आमरण उपोषण सुरू केले आहे. काल उपोषणाचा तिसरा दिवस होता.



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांच्या नेतृत्वात बीडचे जिल्हाध्यक्ष जीवन श्रीपती गायकवाड यांनी १२ ऑगस्ट रोजी उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, एनएच-५४८ डी हा लोखंडी सावरगाव ते सनगाव ग्रामीण रस्ता क्रमांक-११९ हा पाईपलाईन कामासाठी विना परवानगी खोदून जि.प.बांधकाम विभागाचे अंदाजे ३० लाख रूपयांचे नुकसान करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता आणि संबंधित गुत्तेदार होळंबे यांच्यावर गुन्हा दाखल करून शासनाचे नुकसान झालेली ३० लाख रक्कम वसूल करून सदरील एजन्सी ब्लॅक लिस्ट करणे बाबत वेळोवेळी निवेदन देऊन याप्रश्नी रस्ता रोको, मोर्चा सारखी आंदोलने करून दोषींविरुद्ध कारवाई करण्याबाबत आपल्या कार्यालयाकडे मागणी केली होती. परंतु, कोणत्या तरी दबावापोटी अद्यापपर्यन्त कसल्याही प्रकरची कारवाई झाली नसल्याने दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी पासून उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसत आहे. असे निवेदनात नमूद केले आहे. सदरील निवेदनात संबंधित अधिकारी व गुत्तेदार यांची नांवे नमूद केली आहेत. याच प्रश्नी ९ मे २०२४ रोजी जिल्हा परिषद उपविभाग, अंबाजोगाईचे उपअभियंता आर.बी.काळे यांनी संबंधित गुत्तेदाराने खोदकाम केलेल्या जागेचा रितसर पंचनामा केला होता. १६ मे २०२४, १७ मे २०२४, २२ मे २०२४ रोजी पत्र दिले. तर १८ जुन २०२४ रोजी रास्ता रोको आंदोलन बाबतचे निवेदन दिले. २० जुन २०२४ रोजी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपअभियंता यांच्याशी पत्रव्यवहार केला, त्यानंतर २५ जुन २०२४ रोजी एक महिन्यात नुकसान झालेल्या रस्त्याचे डांबरीकरण करून देवूत असे हमीपत्र संबंधित गुत्तेदार यांचा प्रतिनिधी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून देण्यात आले. म्हणून जीवन गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले नाही. तरी परंतु, आजपावेतो नुकसान झालेल्या रस्त्याचे डांबरीकरण झालेले नाही. नादुरूस्त रस्त्याचा त्रास शालेय विद्यार्थी, वयोवृद्ध नागरिक, दिव्यांग व्यक्तींना होत आहे. असे असले तरी या प्रकरणी दोषींविरूद्ध कारवाई होत नाही तोपर्यन्त आमरण उपोषण सुरू राहील. काही अनुचित प्रकार घडल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची दक्षता घ्यावी. असे निवेदनात नमूद करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड यांनी १२ ऑगस्ट पासून आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाचा कालचा तिसरा दिवस आहे. मागील ३ दिवसांत गायकवाड यांच्या आमरण उपोषणाला जनता, विविध सामाजिक संघटना यांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता व संबंधित गुत्तेदारांवर गुन्हा दाखल केला नाही. तर जनहितार्थ तीव्र आंदोलन करण्यात येईल

# धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सवानिमित्त ह.भ.प.केशव महाराज पवार यांचे किर्तन

वडवणी ।प्रतिनिधी

धुनकवाड गावचे ग्रामदैवत धुनकेश्वर देवस्थान येथे गेल्या नऊ वर्षांपासून सुरू असलेल्या श्रावण सोमवार महोत्सवानिमित्त चौथा सोमवार दि.१८ऑगस्ट २०२५ रोजी ११ते १ किर्तनसेवा शिवचरित्रकार ह.भ.प.केशव महाराज पवार (आळंदी देवाची)यांचे किर्तन होणार आहे तरी या पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी या किर्तनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

धुनकवाड येथील धुनकेश्वर देवस्थानात गेल्या नऊ वर्षांपासून ह.भ.प.भागवताचार्य श्रीराम महाराज शेळके यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या श्रावण महोत्सवाचे प्रति वर्षाप्रमाणे या ही वर्षी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन चार सोमवारी नामवंत किर्तनकारांचे किर्तन होत असुन पहिल्या श्रावण सोमवारी भागवताचार्य ह.भ.प.श्रीराम महाराज शेळके यांचे किर्तन झाले आहे.तर दुसऱ्या सोमवारचे किर्तन ह.भ.प.राजेंद्र महाराज वाघमारे यांचे झाले असून तिसऱ्या सोमवारचे किर्तन ह.भ.प.रामकृष्ण बापु रंधवे महाराज यांचे किर्तन झाले.तर चौथ्या श्रावण सोमवारी ची किर्तनसेवा शिवचरित्रकार ह.भ.प.केशव महाराज पवार यांच्या सुश्राव्य वाणीतुन होणार आहे.तरी पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी या हरिकिर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादाचे यजमान विक्रम रघुनाथ करांडे,मोहन यदा नांदे,पारराम मारुती यादव,गिन्यानदेव हरिभाऊ गावडे,त्रिंबक म्हतारबा यादव, अर्जुन सदाशिव डोंगरे,विठ्ठल जनार्धन डोंगरे,भागवत शामराव धोंगडे,राहुल तात्याराम खेलबुडे,हनुमान शिवाजी करांडे,अशोक सुखदेव यादव,वैजनाथ मनोहर डोंगरे,नितीन सुदाम तोंडे,रत्नेश्वर सूर्यकांत सावंत,उत्तरेश्वर विश्वनाथ भोसले,दिनकर बाजीराव रोटे,विजय श्रीरंग गायकवाड,विष्णु बाबाराव यादव,तुकाराम दौला मुंडे,महादेव रामा काळे, ज्ञानेश्वर चंद्रसेन रोटे,भारत नानाभाऊ सावंत,राहुल अशोक यादव,ज्ञानेश्वर बन्सी यादव,छत्रभुज दादाराव नाईकवाडे,महादेव रामभाऊ यादव,वैजनाथ बाबुराव नाईकवाडे,शिवनारायण संदिपान करांडे,हनुमान श्रीरंग बजगुडे,विलास गंपू सत्वधर,सखाराम प्रभाकर मनेरी,रामचंद्र रघुनाथ कागणे,श्रीराम गणपती यादव,बाबुराव श्रीरंग तोंडे,कल्याण महादेव रोडे यांच्यासह धुनकेश्वर श्रावण महोत्सव समिती व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ शिवस्मारकाचे सुशोभीकरण करण्यात यावे,किल्लेधारूर

## सकल मराठा समाजाची मागणी

किल्लेधारूर/प्रतिनिधी

किल्लेधारूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे सुशोभीकरण करण्यात यावे तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांना हार घालण्यासाठी हायड्रोलीक सीडी बसविण्यात यावी तसेच संरक्षित कठडे(जाळी) बसविण्यात यावी. विद्युत रोषणाई करण्यात यावी तसेच शिवस्मारकाच्या आजूबाजूला लावण्यात येणारे बॅनर फलक लावण्यात येऊ नये. शिवस्मारकाची स्वच्छता करण्यात यावी यासह इतर मागण्यासाठी मुख्याधिकारी नगर परिषद कार्यालय किल्लेधारूर यांना समस्त शिवप्रेमीच्या वतीने निवेदन देण्यात आले.याप्रसंगी निवेदनावर संदीपभैय्या शिनगारे,बाळू भाऊ कुरुंद,प्रशांत शिनगारे, पवन धोत्रे,इंजि.जनक फुन्ने,दादा शेरकर,रोहित गायकवाड,ड.युवराज फुन्ने,निलेश शिनगारे, आदिनाथ शिनगारे यांच्यासह अनेक शिवप्रेमीच्या सह्याचे निवेदन देण्यात आले आहे.



# शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग,खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत मांडला प्रश्न,केंद्रीय मंत्री गडकरींनी दिले उत्तर

बीड/प्रतिनिधी

शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी मधील परतूर ते कळंब पर्यन्तचा मार्ग बीड जिल्ह्यातून जातो.या टप्प्यातील अपूर्ण कामे, जोड-रस्ते व अडथळ्या मुळे थांबलेली कामे रस्ता बांधकामाचा सुमार दर्जा व त्यामुळे नागरिकांना होणाऱ्या गैरसोयी व अपघात याबाबत खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत प्रश्न उपस्थित केला होता.रस्ते कामाचा सुमार दर्जा,तांत्रिक दोष आणि ठेकेदारांची मनमानी याबाबतही खा.बजरंग सोनवणे यांनी खंत व्यक्त केली. या प्रश्नाला केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी उत्तर दिले असून अपुर्ण कामे तातडीने पुर्ण करण्याचे तसेच कामाच्या दर्जा बाबतही आश्वासन दिले आहे.रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी उत्तरात म्हटले आहे,शेगाव- पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी यामहामार्गाचा एकूण ७२० किमीपैकी ७०८ किमीचा रस्ता पूर्ण झाला असून उर्वरित १२ किमीचे काम विविध टप्प्यांवर आहे.हे काम टप्प्या टप्प्याने २०२७-२८ पर्यन्त पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.परतूर-माजलगाव (किमी ५१-१०१) टप्पा २०१७ मध्ये सुरू होऊन दि.३१ जुलै २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र,विद्यमान महामार्ग प्राधिकरणाशी वाद, जमिनीचे अधिग्रहणा तील विलंब आणि अन्य पूर्वतयारीतील अडचणीं मुळे सहा वर्षे हे काम रखडलेआहे.माजलगाव तालुक्यातील सादोळा गावाजवळ ६०० मीटर रस्ता स्थानिक विरोधा मुळे अद्याप अपूर्ण आहे तो तातडीने पूर्ण करुन घेण्यात येईल. माजलगाव-केज आणि केज-कळंब टप्प्यांसाठी ९३८.३५ कोटी रुपये मंजूर असून आतापर्यंत ६९० कोटी रुपये खर्च झाले आहेत.या टप्प्यातील उर्वरित काम डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.या महामार्गातील धारुर घाटातील पर्यायी मार्गाचे काम तसेच बर्दापूर-लोखंडी सावरगाव दुहेरीकरणाचे काम नियोजनानुसार वेळेत व मानकानुसार करुन घेण्यात येईल, असेही म्हटले आहे.



अपघातातील पीडितांना मदत


या अपूर्ण रस्त्यांवर वेगाने वाहन चालवणे, हेल्मेट न वापरणे यामुळे अपघात झाले आहेत.पिडितांना हिट अँड रन मोटार अपघात पीडित योजना २०२२ अंतर्गत भरपाई दिली जात आहे.सर्व प्रकल्पांची गुणवत्ता काटेकोर तपासली जाणार असून,मानका नुसार न झालेल्या कामांचे पुनर्निर्माण करण्याची जबाबदारी सरकारची आहे,असेही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी उत्तरात म्हटले आहे.

# वडवणीच्या विश्वनाथ मंदिरात शुक्रवारपासून शिवमहापुराण कथेचे आयोजन

आसलकर यांच्या माऊली समूहाची शिवभक्तांना मेजवानी

वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी शहरातील तहसील कार्यालयाच्या पाठीमागे युवा उद्योजक विनोदशेठ आसलकर यांनी स्वतःच्या जागेत उभारलेल्या श्री.विश्वनाथ मंदिर याठिकाणी श्रावण मासाचे औचित्य साधून भव्य अशा शिवमहापुराण कथाचे आयोजन दि.१५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजीपासून करण्यात आले आहे. तर या कार्यक्रमाची सांगता दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी होणार आहे. तरी वडवणीसह पंचक्रोशीतील महिला भगिनींसह शिवभक्त व भाविक भक्तांनी या भव्य शिवमहापुराण कथेच्या दैनंदिन दुपारी २ ते ५ या वेळेत श्रवणाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन विनोद विश्वासराव आसलकर, विक्की विश्वासराव आसलकर व समस्त माऊली समूह यांच्या वतीने करण्यात आले आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी शहरातील तहसील कार्यालयाच्या पाठीमागे येथील वस्त्रोद्योग क्षेत्रातील नामांकित युवा उद्योजक विनोदशेठ आसलकर यांनी स्वतःच्या जागेत उभारलेल्या श्री.विश्वनाथ शंभू महादेवाचा परिसर हा नेहमीच शिवभक्तांच्या गर्दीने भरलेला असतो. याच ठिकाणी महाराष्ट्रातील नामांकित किर्तनकार ह.भ.प.राजाभाऊ महाराज म्हेत्रे जामखेड यांच्या मार्गदर्शनाखाली श्रावण मासाचे औचित्य साधून भव्य अशा शिवमहापुराण कथाचे आयोजन दि.१५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजीपासून दैनंदिन दुपारी २ ते ५ या वेळेत करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे सायंकाळी ५ ते ७ या वेळेमध्ये हरिपाठ व महिलांचा फुगड्यांचा यांचा कार्यक्रम होईल. महाराष्ट्रातील नामांकित शिवमहापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.दत्तात्रय महाराज हूके साकतकर हे या शिवमहापुराण कथेचे प्रवक्ते असून त्यांच्या कर्णमधुर वाणीतून या शिवमहापुराण कथेची भव्यता अगदी सुक्ष्मपणे भाविकांच्या मनावर बिंबणार आहे. यांप्रसंगी हरिपाठ नेतृत्व संगीत विशारद ह.भ.प.हरिभाऊ महाराज काळे, साथ संगत गायन गंधर्व ह.भ.प.सतीश महाराज खपके, मृदंगाचार्य ह.भ.प.बाबा महाराज मुरुमकर यांची त्यांना साथ लाभणार आहे. दरम्यान शिवमहापुराण भगवान शंकर आणि त्यांच्या अवताराशी निगडीत आहे. त्यात शिव भक्ती, शिव महिमा आणि शिवाचे संपूर्ण जीवन चरित्र वर्णिले आहे. त्याच बरोबर ज्ञान, मोक्ष, उपास, तप, जप यांचा मिळणाऱ्या फळांचे देखील वर्णन आढळतं. शिव महापुराणामध्ये सहस्त्र ज्ञानवर्धक आणि भक्ती विषयक लिहिलेले असून यांविषयी सविस्तर असे वर्णन केलेले आहे. तरी वडवणीकरांसाठी हा शिवमहापुराण कथा सोहळा म्हणजे मोठी अध्यात्मिक पर्वणी ठरणार असून या कथेची सांगता दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी महाप्रसादाने होणार आहे. यादिवशी सकाळी ९ ते १० या वेळेमध्ये शिवमहापुराण कथा संपन्न होईल, त्यानंतर सकाळी १० ते १२ या वेळेमध्ये ह.भ.प.दत्तात्रय महाराज हूके साकतकर यांचे काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर लागलीच महाप्रसादाची पंगत सुरु होईल. या शिवमहापुराण कथेच्या आयोजनाची आवश्यक ती पूर्वतयारी पूर्ण झाली असून तरी वडवणीसह पंचक्रोशीतील महिला, माता भगिनींसह सर्व शिवभक्त व भाविक भक्तांनी या भव्य शिवमहापुराण कथेच्या दैनंदिन श्रवणाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक विनोद विश्वासराव आसलकर, विक्की विश्वासराव आसलकर व समस्त माऊली समूह यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# रेणू हॉस्पिटल बीड येथे महावितरणच्या कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस विनामूल्य सेवा उपलब्ध

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील डॉ.सुरेश मुंडे यांच्या रेणू हॉस्पिटल मध्ये (एम.एस.इ.बी) महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड महामंडळातील कर्मचारी व अधिकारी तसेच लाईनमन यांना रेणू फ्रॅक्चर एक्सीडेंट जॉइंट रिप्लेसमेंट सेंटर केअर बीड मध्ये आता कॅशलेस,विनामूल्य सुविधेसाठी पूर्ण उपलब्ध झाले आहे. महाराष्ट्रातील एम.एस. इ.बी च्या सर्व कर्मचारी पदाधिकारी यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा. रेणू हॉस्पिटलमध्ये एकही पैसा न खर्च करता अत्याधुनिक पद्धतीची उपचार करून घ्यावेत रेणू हॉस्पिटलची अत्याधुनिक पद्धतीची सेवा घ्यावी असे आवाहन रेणू हॉस्पिटल चे डॉ.सुरेश मुंडे व मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे केज तालुकाध्यक्ष शिवाजी घुले यांनी कळविले आहे.डॉ.सुरेश मुंडे प्रसिद्ध ऑर्थोपेडिक सर्जन आहेत.त्यांच्या रेणू हॉस्पिटलमध्ये एमआरआय मशीन तसेच सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टर सुरेश मुंडे यांचे नाव खूप मोठे आहे.त्यांनी कित्येक रुग्णांना उपचार करून जीवनदान दिले आहे. डॉ.सुरेश मुंडे यांनी असंख्य रुग्णावरती शस्त्रक्रिया केलेल्या आहेत व रुग्णांना पुर्ववत केले आहे. अनुभवी व तज्ञ डॉ. म्हणून त्यांची ख्याती आहे.त्यामुळे विद्युत विभागातील सर्व कर्मचारी वर्गाने या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.सुरेश मुंडे रेणू हॉस्पिटल बीड यांनी केले आहे.

# जन्मगाव रुईनालकोल येथे माजी आ.भीमराव धोंडे यांची महेशाच्या चरणी अभिषेक व महापुजा

## तिसऱ्या सोमवारी भाविकांची प्रचंड गर्दी ;पवित्र भूमीत भक्तीचा मळा फुलला

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांचे जन्मगाव असलेल्या महेशच्या चरणी नतमस्तक होत त्यांनी अभिषेक आणि महापूजा करत आपला आध्यात्मिक वारसा जतन केला. माजी आ. भीमराव धोंडे प्रारंभीपासूनच आध्यात्मिक क्षेत्रामध्ये अत्यंत तळमळीने संत महंतांच्या चरणी नतमस्तक होणारे व्यक्तिमत्त्व आहे. संत वामनभाऊ महाराज श्रीक्षेत्र गहिनीनाथगड येथे त्यांनी दोन अश्व तर रुईनालकोल देवस्थानला एक अश्व देवस्थानला अर्पण केला आहे. आपला आध्यात्मिक मोठेपणा या निमित्ताने सिद्ध केलेला होता. कृषी अध्यात्मिक, शिक्षण, समाजकारण, राजकारण आदीसह विविध क्षेत्रांमध्ये त्या समवेत चित्रपट आणि क्रीडा क्षेत्रात ही दमदार कामगिरी करणारे माजी आमदार भीमराव धोंडे एक बहुआयामी नेतृत्व आहे.

आष्टी तालुक्यातील त्यांचे जन्मगाव असलेल्या पवित्र भूमीत माजी आ. भीमराव धोंडे तिसऱ्या सोमवारी आवर्जून उपस्थित झाले. येथील अत्यंत महत्त्वाचे देवस्थान असलेल्या महेशाच्या चरणी ते विनम्र नतमस्तक झाले. महापूजा आणि अभिषेक करून त्यांनी या देवस्थानचे मनोभावे आशीर्वाद घेतले. भीमराव धोंडे



यांच्या समवेत यावेळी असंख्य कार्यकर्ते भाविक भक्त युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देवस्थानच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

अध्यात्मसेवा हा आपला मूलभूत कर्तव्याचा भाग

महाराष्ट्र ही संतांची आणि वीरांची भूमी आहे. संत तुकाराम, संत एकनाथ महाराज, संत रामदास यासारख्या असं संत सज्जनांनी ही भूमी पवित्र केलेले आहे. समता, बंधुत्व, ऐक्य, सर्वधर्मसमभाव ही मूल्य संतांनी या भूमीत रुजवली म्हणूनच संतांच्या आणि देवस्थानच्या चरणी नतमस्तक होण्यात मला आनंद आणि समाधान लाभते अशी प्रतिक्रिया महाअभिषेक आणि पूजा केल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी व्यक्त केली.

# ई-पीक नोंदणीसाठी तांत्रिक बाबींमुळे शेतकऱ्यांना त्रास तात्काळ सुरळीत करा-दत्ता वाकसे



वडवणी ।प्रतिनिधी

शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२५ साठी ई-पीक पाहण्याची प्रक्रिया एक ऑगस्टपासून सुरू झाली आहे. मात्र मोबाईल अँपवर ई-पीक नोंदणीसाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. यातील तांत्रिक बाबी शेतकऱ्यांना समजत नसल्याने नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नोंदणी करताना ओटीपी वेळोवेळी मागितला जातो. प्रत्येक वेळी वेगवेगळ्या ओटीपी येत असल्याने पुढे जाता येत नाही. दरम्यान सर्व डाऊन झाल्यास सर्व प्रक्रिया नव्याने करावी लागते. याशिवाय या पमध्ये पिकाचे फोटो अपलोड करताना कमी एमबीचे लागतात. परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांनी मोबाईलवर शेतात फोटो काढल्यास तो जास्त एमबीचा येतो. त्यामुळे तो अपलोड होत नाही परिणामी पुन्हा नव्याने सर्व प्रक्रिया करावी लागत आहे. खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी एक ऑगस्ट १४ सप्टेंबर या कालावधीमध्ये ई पीक पाहणी करून घ्यावी लागणार आहे. जेणेकरून शासनाच्या पीक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी अनिवार्य

आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतात कोणती पीक घेतले आहे. याचे अचूक माहिती पीक पाहणी प्रणाली द्वारे शासनाकडे नोंदविणे आवश्यक आहे. मोबाईल अॅप मधील पाहणी मध्ये नोंदी केलेल्या पिकाची नोंद सातबारा उताऱ्यावर घेण्यात येणार आहे. यासाठी कोणत्याही प्रकारच्या कागदपत्रांची गरज भासत नाही. शेतकऱ्यांनी इतरांवर अवलंबून न राहता स्वतः पीक पाहणी करावी. यासंदर्भात अडचण आल्यास गावात नियुक्त करण्यात आलेल्या तलाठी, कृषी सहाय्यकांच्या मदतीने नोंदणी पूर्ण कराव्यात, परंतु तशा प्रकारे होताना दिसत नाही त्यामुळे शासन प्रशासन यांनी तात्काळ निर्णय घ्यावा त्याचबरोबर पच्या माध्यमातून होणाऱ्या त्रुट्या तात्काळ दुरुस्त करण्यात यावा असे देखील आवाहन मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी केले आहे.

# टायगर ग्रुप मुंबईचे अध्यक्ष संजयराव खंडागळे यांच्या वाढदिवसानिमित्त

## आशादत्त गोशाळेत लम्पी आजारापासून वाचविण्यासाठी जनावरांना लसीकरण

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील आशादत्त गोशाळेत जनावरांना लम्पी आजारापासून वाचविण्यासाठी लसीकरण करण्यात आले. टायगर ग्रुप मुंबईचे अध्यक्ष संजयराव खंडागळे यांच्या वाढदिवसानिमित्त हा विधायक उपक्रम राबविण्यात आला असल्याची माहिती गोरक्षक उमेशभाऊ पोखरकर यांनी दिली.

आशादत्त गोशाळा अंबाजोगाई येथे गायींना लम्पी आजाराची लागण होवू नये याबाबत वेळीच योग्य ती दक्षता घेवून प्रतिबंधात्मक उपाय लसीकरण करण्यात आले. याबाबत अधिक माहिती देताना गोरक्षक उमेशभाऊ पोखरकर यांनी सांगितले की, टायगर ग्रुप मुंबईचे अध्यक्ष संजयभाऊ खंडागळे



यांच्या वाढदिवसानिमित्त हा विधायक उपक्रम राबविण्यात आला. बीड जिल्ह्यासह परिसरामध्ये लम्पी हा आजार वेगाने वाढत असल्याचे अनेकांकडून समजले. आशादत्त गोशाळेतील जनावरांना लम्पी आजारापासून वाचविण्यासाठी लसीकरण करणे आवश्यक आहे. लम्पी स्कीन डिसीज हा गुरांमध्ये होणारा एक विषाणूजन्य रोग आहे आणि लसीकरण हा यापासून बचाव करण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. लसीकरण का महत्वाचे आहे तर लम्पी स्किन डिसीज (एलएसडी) हा एक संसर्गजन्य रोग आहे आणि लसीकरणामुळे जनावरांमध्ये या आजारास प्रतिबंध होतो. आजाराची तीव्रता कमी करणे हा उद्देश आहे. जर जनावराला लस दिली असेल, तर त्याला लागण झाली तरी आजार सौम्य स्वरूपात होतो आणि त्याचे गंभीर परिणाम टाळता येतात. यामुळे जनावरांमध्ये रोग प्रतिकारशक्ती वाढते. ज्यामुळे जनावर आजारांना अधिक चांगल्या प्रकारे तोंड देऊ शकतात. तसेच लसीकरणामुळे साथ पसरण्याचा धोका कमी होतो. लम्पी स्कीन डिसीजसाठी गोटपॉक्स ही लस वापरली जाते. लसीकरण करण्यापूर्वी पशुवैद्यकाचा सल्ला घेणे आवश्यक आहे. ते योग्य मात्रा आणि लसीकरण करण्याची योग्य पद्धत सांगू शकतील. निरोगी जनावरांचे लसीकरण करावे.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर ) पक्षाच्या बिड जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी पत्रकार बाळासाहेब जाधव यांची निवड

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील उमरी या गावचे रहिवाशी पत्रकार बाळासाहेब मधुकर जाधव यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आंबेडकर)या पक्षाच्या बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी निवड झाली आहे. याबाबतीत सविस्तर वृत्त असे की,केज येथील शासकीय विश्रामगृह येथे दिनांक १२ आगष्ट रोजी दुपारी ३ वाजता रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर)या पक्षाची बैठक संपन्न झाली.या बैठक प्रसंगी बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदी बाळासाहेब मधुकर जाधव यांची निवड करण्यात आली. ही निवड रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे राष्ट्रीय नेते दीपक भाऊ निकाळजे यांच्या आदेशाने व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष भगवंत आप्पा वायबसे यांच्या उपस्थितीत करण्यात आली.या



निवडीमुळे बाळासाहेब जाधव यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष भगवंत आप्पा वायबसे,मराठवाडा प्रवक्ता ज्ञानेश्वर गिरी, मराठवाडा संपर्कप्रमुख सौ आम्रपाली गजेशिव, महिला केज तालुका अध्यक्ष बचुटे मॅडम, महादेव केदार,किरण कसबे,विशाल नवगिरे आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) हा पक्ष अन्याय अत्याचार करणाऱ्यांच्या विरोधात लढणारा आणि रस्त्यावर उतरून न्याय मागणार आहे,यापक्षाचे नेते दीपक भाऊ निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणारा हा पक्ष आहे. विनाकारण कोणत्याही समाजावर अन्याय अत्याचार झाला तर हा पक्ष पूर्ण ताकतीने रस्त्यावर उतरेल,माझी बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी निवड केल्याबद्दल राष्ट्रीय नेते दीपक भाऊ निकाळजे व मराठवाडा अध्यक्ष भगवंत आप्पा वायबसे यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. बाळासाहेब जाधव रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आंबेडकर) बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख

# डॉ.अनिकेत निंबोरे यांचे यश

आष्टी (प्रतिनिधी) डॉ. अनिकेत सोपान निंबोरे यांनी नुकतेच नवी दिल्ली येथील नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन द्वारे घेतलेल्या फॉरेन मेडिकल ग्रॅड्यूएट एक्झामीनेशन या परीक्षेत यश संपादन केले आहे.

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपान रावसाहेब निंबोरे यांचे चिरंजीव डॉ. अनिकेत निंबोरे यांनी नुकत्याच झालेल्या एफएमजीई म्हणजेच फॉरेन मेडिकल ग्रॅड्यूएट एक्झामीनेशन या परीक्षेत उत्तम यश संपादन केले आहे. दिल्ली येथील नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन द्वारे घेतलेल्या या



परीक्षेचे वैद्यकीय क्षेत्रात महत्वाचे स्थान आहे. त्यांच्या या यशाबद्दल आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. किशोरनाना हंबर्डे, उपाध्यक्ष श्री. दिलीपशेठ वर्धमाने, सचिव श्री. अतुलकुमार मेहेर आणि सर्व संचालक मंडळाने तसेच सर्व स्टाफने प्राचार्य डॉ. सोपान निंबोरे व डॉ. अनिकेत निंबोरे यांचे अभिनंदन केले आहे

# हर घर तिरंगा हर घर स्वच्छता धर्माबाद शहरात नागरिकांचा मोठ्या संख्येने सहभाग

धर्माबाद ।प्रतिनिधी

धर्माबाद शहरातून दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजी घर घर तिरंगा हर घर स्वच्छता रॅलीचे आयोजन नगरपालिके तर्फे करण्यात आले होते. यावेळी शहरातील सर्व देशभक्त नागरिक, भारतीय जनता पक्ष, धर्माबाद शहरातील हुतात्मा पानसरे हायस्कूलचे विद्यार्थी, जिजामाता हायस्कूलचे विद्यार्थी,लालबहादूर शास्त्री महाविद्यालय यांचे विद्यार्थी, यांच्या संयुक्त विद्यमाने हर घर तिरंगा हर घर स्वच्छता या प्रभात फेरी धर्माबाद शहरातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पानसरे चौक, नरेंद्र चौक,पोलीस स्टेशन,निघून नगरपरिषदेसमोर सांगता करण्यात आली.

धर्माबाद शहरातून हर घर तिरंगा रॅलीचे आयोजन धर्माबाद नगर परिषदेचे मुख्याधिकारी कस्तुर गव्हाणे यांनी केली.भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त धर्माबाद नगरपरिषदेच्या वतीने लोकांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल जागृती निर्माण करणे, आणि राष्ट्रध्वजासोबत प्रत्येक नागरिकांचा वैयक्तिक बंद जोडणे या उद्देशाने या तिरंगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते सदरील पदयात्रेत विद्यार्थ्यांनी.भारत माता की जय, वंदे मातरम, वंदे मातरम, भारतीय स्वातंत्र्याचा विजय हो हर घर तिरंगा हर घर तिरंगा हर घर स्वच्छता या जयघोषाने धर्माबाद शहरातील वातावरण देशभक्ती मंत्रमुग्ध झाले होते. प्रत्येक विद्यार्थ्याच्या हाती तिरंगा झेंडा






फडकवीत सदर पदयात्रा शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली सदर पदयात्रा शहरातील मुख्य रस्त्यावरून जात असताना धर्माबाद उपविभागीय अधिकारी श्रीमती स्वाती दाभाडे मॅडम व मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे साहेब, भारतीय जनता पक्ष एडवोकेट चक्रेश पाटील बनाळीकर, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रवींद्र अण्णा पोतघंटी , संजय जी पवार, हुपा हायस्कूलचे मुख्याध्यापक सन्मुख बेंबरेकर , गटसाधन केंद्राचे केंद्रप्रमुख आबासाहेब उस्करवार,तालुकाध्यक्ष धनराज भाऊ चोळाखेकर, वेगवेगळ्या पक्षांचे पदाधिकारी, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार,शिक्षक वर्ग, सर्वसामान्य जनता, नगरपरिषदेचे कर्मचारी अधीक्षक आकाश पांडुरंग पाणीपुरवठा अभियंता प्रमोद घाटके कर लेखापाल लतीफ शेख शंकर तमन्ना, प्रकाश नागरगोजे,संगमेश्वर रामशेठ,भीमराव सूर्यवंशी, अनंत कुडाळे,शेख, सतोष पवार, सूर्यकां,त मोकले,सुनिता जुनेकर, नागेश अपलोड,रमेश घाटे, नितीन दावणे, लक्ष्मण झुंजारे,राम मुळे,राजेश खटके, जतीन, किरण बेचकेवार, सूर्यकांत पवार,सुरेश कोठारे, राजरतन सूर्यवंशी,गणेश करपे, इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

# बालरंगभूमीच्या इतिहास महाराष्ट्राच्या स्पर्धेतून गेवराईचा आर्ट ऑफ फन आणि आयकॉन इग्लीश स्कूल

## यांची मुंबईच्या अंतिम फेरी साठी निवड

बीड ।प्रतिनिधी

येथील बालरंगभूमी परिषद शाखा बीडच्या वतीने इतिहास महाराष्ट्राचा या स्पर्धेतून गेवराईचा आर्ट ऑफ फन अॅकदमी संघ आणि आयकॉन इग्लीश स्कूलच्या संघाची व लहान गटातील ज्ञानदा जोशी, सिध्दी पाटील आदर्श विद्यालय बीड तर मोठया गटात श्री.श्री.रवीशंकर विद्या मंदीर बीडची श्रावणी डोंगरे व केंब्रीज व्हॅली स्कूल,गेवराईचा पार्थ पवार यांची मुंबई येथे होणार्या अंतिम स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सर्व विजेत्याचे अभिनंदन श्रीमती. निलम शिर्के -सामंत अध्यक्ष बालरंगभूमी परिषद ,डॉ.दीपा क्षीरसागर बालरंगभूमी परिषद उपाध्यक्ष यांनी केले आहे.

बीड येथे झालेल्या प्राथमिक फेरीत १६ स्कूल संघानी सहभाग नोंदवला. यात रामेशवर विद्यालय उमरी,आर्ट ऑफ फन अॅकदमी गेवराई,सैनिकी विद्यालय बीड, स्वा.सावरकर मा.विद्यालय बीड दोन संघ ए.जी. ड्राँईग क्लासेस बीड, आर.के. पब्लीक स्कूल अॅण्ड ज्यु.कॉलेज ताकडगाव तीन संघ, पोदार इंटरनॅशनल स्कूल दोन संघ, श्री.श्री.रविशंकर विद्या मंदीर, आय.कॉन इग्लीश स्कूल, द




केंब्रिज व्हॉली इंटरनॅशनल स्कूल,रिझम स्टाईल डान्स अकॅडमी ,बीड इगलवूड इग्लीश स्कूल माजलगाव संघानी सहभाग घेतला तर लहान गटात २० बाल कलावंतांनी तर मोठया गटातून १७ जनानी सहभाग नोंदवला.

अंतिम फेरी दिनांक २३ व २४ ऑगस्ट दरम्यान मुंबई येथील यशवंतराव चव्हाण नाटय संकुल माटूंगा येथे होणार आहे.या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून लातुरचे शाहीर संतोष साळूंके व मनोज शिवाजी शिवलकर यांनी काम पाहिले. या सर्व बाल कलावंतांच्या यशाबद्दल व पुढील सादरीकरण करण्यासाठी नाटय परिषदेच्या सर्व सदस्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहे.

यावेळी बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर,सहकार्यवाहक स्नेहलताई पाठक,प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर,प्रमुख कार्यवाह संजय पाटील देवळाणकर,कोषाध्यक्ष डॉ.व्ही.टी.देशमाने,जिल्हासमन्वयक शाहीर विलास सोनवणे आदी मंचावर उपस्थित होते.

महाराष्ट्रभर चालणार्या या इतिहस महाराष्ट्राचा स्पर्धा करिता उदंड असा प्रतिसाद मिळाला यात जवळपास ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मिलिंद शिवणीकर,अमित गाडे,सिद्वार्थ अग्रवाल,अनिता शिंदे,दुष्यंता रामटेके,विजय राख,दीपक जमधाडे,राहूल सोनवणे,सुरेश थोरात,सुरेश साळुंखे,नामदेव साळूंखे,किरण राठोड,इंद्रजीत भागे,असलम शेख आदींनी परिश्रम घेतले.

# होळ येथे आयपीएस अंकुशराव शिंदे यांचा रविवारी होणार सेवापूर्ती सन्मान सोहळा

## कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे ग्रामस्थांचे आवाहन

केज ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील होळचे सुपुत्र राज्याच्या व्हीआयपी सुरक्षा विभागाचे विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे यांनी सेवानिवृत्तीला ४ महिने शिल्लक असताना स्वेच्छानिवृत्ती घेतली. यानिमित्ताने त्यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा होळ येथे रविवारी (दि.१७) सकाळी १०.३० वाजता हनुमान मंदिरात ग्रामस्थांच्यावतीने आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अश्विनीताई शिंदे ह्या असतील. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राजस्थानचे माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे, मांजरा कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक दत्तासाहेब शिंदे, माजी सरकारी वकील अॅड.प्रकाश शिंदे, माजी अपर जिल्हाधिकारी अण्णासाहेब शिंदे, पुणे सीआयडीचे पोलीस उपाधीक्षक दीपक शिंदे, नागपूरचे महावितरण कंपनीचे माजी मंडळ अभियंता लक्ष्मण खाडे, गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, केंद्रप्रमुख रमेश कांबळे, प्रा.डॉ.ज्ञानोबा सरवदे, बारामती अॅग्रोचे प्रबंधक



अंकुश ढवारे, मुख्याध्यापक धर्मराज शिंदे, हृदयरोग तज्ञ डॉ.नवनाथ घुगे, डॉ.गणेश ढवारे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन सर्व ग्रामस्थांनी केले असून परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सेवानिवृत्त विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे यांच्या कार्याचा गौरव करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. दरम्यान, होळच्या मातीतील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसह विशेष पाहुण्यांच्या उपस्थितीत होणारा हा सोहळा गावासाठी अभिमानाचा क्षण ठरणार आहे.